सोमवार, २३ मे २०२२

# रामप्रहर

◆ वर्ष १४ ◆ अंक ३०५
www.ramprahar.com

◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अंतरंग

खोल समुद्रात यांत्रिकी नौकांना मासेमारी बंदी/२
पेणमध्ये अल्पवयीन मुलीची गळफास घेऊन आत्महत्या/५
दिल्लीच्या पराभवामुळे बंगळुरू प्लेऑफमध्ये/८

## पंतप्रधान नरेंद्र मोदी १४ जूनला महाराष्ट्रात



**मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी महाराष्ट्र दौऱ्यावर येणार आहेत. पंतप्रधान १४ जूनला राज्यात येणार असल्याच्या माहिती भाजप आध्यात्मिक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष आचार्य तुषार भोसले यांनी ट्वीट करून दिली. पंतप्रधान देहूत मंदिराच्या लोकार्पणासाठी येणार आहेत. त्यांच्या हस्ते जगद्गुरू तुकाराम महाराज शिळा मंदिराचे लोकार्पण होणार आहे. पंतप्रधान मोदी याआधी ६ मार्चला पुण्यात मेट्रो प्रकल्पाच्या उद्घाटनासाठी आले होते. आचार्य तुषार भोसले यांनी दोन महिन्यांपूर्वी २९ मार्चला पंतप्रधानांची भेट घेतली होती. या भेटीत भोसले यांनी पंतप्रधान मोदी यांना आमंत्रण दिले होते. त्या वेळी त्यांच्यासोबत देहू संस्थानचे विश्वस्तही उपस्थित होते. भोसले यांनी दिलेले आमंत्रण पंतप्रधानांनी स्वीकारले व त्यानुसार आता पंतप्रधान १४ जूनला देहूत येणार आहेत.

# शिवसेनेनेच एमआयएमला मोठे केले

## राज ठाकरे यांचा पुण्यातील सभेत गंभीर आरोप




**पुणे : प्रतिनिधी**

पुण्यात रविवारी (दि. २२) झालेल्या सभेत बोलताना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे राज ठाकरे यांनी शिवसेनेवर अप्रत्यक्षपणे गंभीर आरोप केला. यांच्या राजकारणासाठी, हिंदू-मुसलमान मतांच्या ध्रुवीकरणासाठी यांनीच एमआयएमला मोठे केल्याचे ते म्हणाले. आपल्या भाषणात त्यांनी विविध विषयांवर परखड मते व्यक्त केली.

अयोध्या दौरा तूर्त स्थगित केल्याने पुण्यातील राज ठाकरे यांच्या सभेची उत्सुकता गेल्या दोन दिवसांपासून ताणली गेली होती. गणेश कला क्रीडा मंच येथे झालेल्या सभेत बोलताना राज यांनी वेगवेगळ्या मुद्द्यांवर भूमिका मांडली. अयोध्या दौरा स्थगित केल्याबद्दल सुरू असलेल्या चर्चेवर त्यांनी या वेळी स्पष्टीकरण दिले. त्याचवेळी औरंगजेबाच्या कबरीच्या मुद्द्यावरूनदेखील त्यांनी सत्ताधाऱ्यांवर विशेषतः शिवसेनेवर निशाणा साधला. काही दिवसांपूर्वी एमआयएमचे अध्यक्ष असदुद्दीन ओवेसी यांचे बंधू अकबरूद्दीन ओवेसी यांनी औरंगाबादमध्ये औरंगजेबाच्या कबरीचे दर्शन घेतल्यावरून मोठा वाद निर्माण झाला होता. त्या संदर्भात बोलताना राज यांनी यासाठी शिवसेनेला जबाबदार धरले.

या वेळी औरंगाबादच्या नामांतरावरून राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंवर निशाणा साधला. परवा मुख्यमंत्री म्हणाले, संभाजीनगरचे नामांतर झाले, नाही झाले फरक पडत नाही. मी बोलतोय ना. तू कोण आहेस? मी बोलतोय याला काय लॉजिक आहे? इतकी वर्षे हे केंद्रात सरकारमध्ये होते, आजपर्यंत संभाजीनगरचा प्रश्न मिटवला का? कारण तो सतत निवडणुकांसाठी जिवंत ठेवायचा आहे. याच गोष्टी फक्त यांना करायच्या आहेत. उद्या नामांतर झाले, तर प्रश्नच मिटला. मग बोलायचे कशावर? अनेक शहरांमध्ये १०-१० दिवस पाणी येत नाहीये. ते विषयच नाहीत याकडे राज ठाकरे यांनी लक्ष वेधले.

शिवसेनेवर टीका करताना राज ठाकरे म्हणाले की, एमआयएम सतत हिंदुविरोधात बोलत राहिली पाहिजे ज्यातून यांची रोजीरोटी चालेल. यांच्या लक्षात आले नाही की आपण एक राक्षस वाढवतोय. म्हणता म्हणता यांच्या राजकारणात औरंगाबादमध्ये एमआयएमचा खासदार झाला. निजामाच्या औलादी महाराष्ट्रात वळवळायला लागल्या. त्यांना भुसभुशीत जमीन यांनीच करून दिली. औरंगाबादचे लवकरात लवकर संभाजीनगर हे नामांतर करून यांचे राजकारण एकदा मोडीत काढून टाका अशी विनंती मी पंतप्रधानांना करीत असल्याचेही राज म्हणाले.

शिवसेनेचा औरंगाबादमधला खासदार पडला आणि एमआयएमचा निवडून आला. आमच्याच महाराष्ट्रात एमआयएमची औलाद येते आणि जो आमच्या शिवछत्रपतींना मारण्यासाठी आग्र्याहून निघाला त्या औरंगजेबाच्या कबरीवर डोके टेकवतात. याची लाज वाटत नाही. सत्ताधारीच असे बसले आहेत, अशा शब्दांत राज ठाकरे यांनी निशाणा साधला.

दरम्यान, १ जून रोजी आपल्यावर हिप बोनची शस्त्रक्रिया होणार असल्याची माहिती राज ठाकरेंनी स्टेजवरून बोलतानाच जाहीरपणे दिली.

### उद्धव, आदित्यवर निशाणा

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पुण्यातील सभेत थेट मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर घणाघाती टीका केली. उद्धव यांनी एकतरी आंदोलन केले आहे का? त्यांच्या अंगावर एक तरी केस आहे का, असा सवाल राज यांनी केला. आदित्य ठाकरे यांनाही त्यांनी या वेळी फटकारले. तुमच्या सोयीसाठी कशाला इतिहास बदलताय? यांचे राजकारण तुम्ही समजून घेतले पाहिजे. प्रत्येक वेळी तुम्हाला गृहीत धरून हे चालणार. काल शिवसेनेतील कुणी बोलले की, महाविकास आघाडी सरकार हे पाहिले असते, तर बाळासाहेबांना आनंद झाला असता. तुम्ही बाळासाहेब ठाकरेंची क्रेडिबिलिटी घालवताय. शिवसेनेला कळत नाहीये की, तुम्ही कुणाबरोबर राहात आहात, असे राज ठाकरे म्हणाले.



## कॅन्सर हॉस्पिटलमधील रुग्णांसाठी रक्तदान शिबिर

### खारघर येथील उपक्रमाचे मान्यवरांकडून कौतुक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खारघरमधील युवा प्रेरणा सामाजिक संस्थेच्या वतीने अध्यक्ष किरण पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून टाटा कॅन्सर हॉस्पिटलच्या सहकार्याने या हॉस्पिटलमधील रुग्णांसाठी रक्तदान शिबिराचे आयोजन रविवारी (दि. २२) रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल येथे करण्यात आले होते. या शिबिराला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि पनवेल महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देत उपक्रमाचे कौतुक केले.

या वेळी भाजप खारघर तळोजा मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल, नगरसेवक रामजी बेरा, आयोजक नगरसेविका नेत्रा किरण पाटील, मंडल उपाध्यक्ष दिलीप जाधव, सरचिटणीस दीपक शिंदे, व्यापारी सेल अध्यक्ष अंबाबाई पटेल, समीर कदम, राजकुमार चौधरी, शोभा मिश्रा, मोना अडवाणी, विलास आळेकर, भरत कोंढाळकर, गोपाळ राजपूत, कुणाल देवकर, वैभव शेजवळ, आदित्य हाटगे, अनिकेत कातोरे, मंजू चोप्रा यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. विशेष म्हणजे या शिबिरात स्वत: किरण पाटील यांनीही दरवर्षीप्रमाणे रक्तदान केले. या उपक्रमाबद्दल लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर आणि सभागृह नेते परेश ठाकूर यांनी कौतुक केले. त्यांच्या हस्ते रक्तदात्यांना प्रमाणपत्र, सन्माचिन्ह देण्यात आले.



## निवडक

### श्रीलंकेतील आणीबाणी मागे

**कोलंबो :** श्रीलंकेत गेल्या दोन आठवड्यांपासून लागू करण्यात आलेली आणीबाणी शुक्रवारी (दि. २०) मध्यरात्री हटवण्यात आली. देशात निर्माण झालेल्या अभूतपूर्व आर्थिक संकटामुळे प्रचंड जनक्षोभ उसळल्याने देशभर आणीबाणी लागू करण्यात आली होती, परंतु आता देशांतर्गत कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती सुधारल्याने आणीबाणी हटविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अध्यक्षांच्या सचिवालयातर्फे हा निर्णय जाहीर करण्यात आला.

### पंतप्रधान मोदी जपान दौऱ्यावर

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी जपानच्या दौऱ्यावर गेले आहेत. जपानचे पंतप्रधान फुमिओ किशिदा यांच्या आमंत्रणावरून ते क्वाड नेत्यांच्या शिखर परिषदेला उपस्थित राहणार आहेत. या दौऱ्यात ते अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन, जपानचे पंतप्रधान फुमियो किशिदा आणि ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान स्कॉट मॉरिसन यांनाही भेटणार आहेत.

## ओबीसी आरक्षणासाठी आज पनवेलमध्ये भाजपचे उपोषण

**पनवेल : प्रतिनिधी**

राज्यातील महाविकास आघाडी सरकारने ओबीसी समाजाच्या आरक्षणाची राजकीय हत्या करून ओबीसी समाजास दडपण्याचे षडयंत्र रचले आहे. याच्या निषेधार्थ तसेच मध्य प्रदेश सरकारप्रमाणे महाराष्ट्र सरकारला लोकशाही मार्गाने ओबीसींचे राजकीय आरक्षण पुनर्स्थापित करण्यास भाग पाडण्यासाठी भाजप ओबीसी मोर्चातर्फे सोमवारी (दि. २३) पनवेल प्रांत कार्यालयाशेजारी एकदिवसीय लाक्षणिक उपोषण करण्यात येणार आहे.

ज्याप्रमाणे मध्य प्रदेश सरकारने सर्वोच्च न्यायालयात ओबीसींचे आरक्षण पुनर्स्थापित केले त्याप्रमाणे महाराष्ट्र सरकार का करू शकत नाही याचा जाब विचारण्यासाठी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा विधानसभा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील, ओबीसी मोर्चा प्रदेशाध्यक्ष आमदार योगेश टिळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल प्रांत कार्यालयाशेजारी एकदिवसीय लाक्षणिक उपोषण केले जाणार आहे.

भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष तथा पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर आणि उरणचे आमदार महेश बालदी यांच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या या उपोषणात पदाधिकारी, कार्यकर्ते, ओबीसी बंधू-भगिनींनी सहभागी होऊन सरकारला लोकशाही मार्गाने ओबीसीचे राजकीय आरक्षण पुनर्स्थापित करण्यास भाग पाडूया, असे आवाहन ओबीसी मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष ॲड. मनोज भुजबळ, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष राजेश गायकर आणि महिला जिल्हाध्यक्ष व उपमहापौर सीताताई पाटील यांनी केले आहे.

## इंधन दरकपातीबद्दल इम्रान खानकडून मोदी सरकारचे कौतुक

**कराची : वृत्तसंस्था**

मोदी सरकारने केलेल्या पेट्रोल आणि डिझेलच्या दरात कपात करण्याच्या घोषणेचे पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांनी कौतुक केले आहे. भारत सरकारच्या निर्णयाची माहिती शेअर करताना पाकिस्तान तहरीक-ए-इन्साफचे नेते इम्रान खान यांनी ट्विटरवर प्रतिक्रिया दिली आहे.

केंद्र सरकारने शनिवारी इंधनावरील उत्पादन शुल्कात कपात केल्यानंतर पेट्रोल प्रतिलिटर ९.५ रुपये आणि डिझेल सात रुपयांनी स्वस्त झाले आहे. या पार्श्वभूमीवर इम्रान खान म्हणाले की, त्यांच्या सरकारला लोकांना दिलासा देण्यासाठी अशीच कारवाई करायची होती, परंतु मीर जाफर आणि मीर सादिक सत्तापरिवर्तनासाठी बाहेरील दबावाला बळी पडले आणि आता डोके नसलेल्या कोंबड्यासारखे अर्थव्यवस्थेसोबत देश चालवत आहेत.

## केंद्रानंतर आता राज्य सरकारकडून पेट्रोल-डिझेलच्या दरामध्ये कपात



**मुंबई : प्रतिनिधी**

केंद्र सरकारने सर्वसामान्यांना दिलासा देत पेट्रोल-डिझेलच्या दरात कपात केल्यानंतर आता राज्य सरकारने पेट्रोलडिझेलच्या दरात कपात केली आहे. राज्य सरकारने पेट्रोलच्या दरात दोन रुपये आठ पैसे आणि डिझेलच्या दरात एक रुपये ४४ पैशांची कपात केली आहे.

केंद्राने अबकारी करात कपात केल्याने देशात पेट्रोल साडेनऊ रुपयांनी, तर डिझेल सात रुपयांनी स्वस्त झाले आहे. केंद्रानंतर केरळ आणि राजस्थाननेही पेट्रोल-डिझेलवरील कर कमी केला. त्यामुळे महाविकास आघाडी सरकारवरही दडपण होते. अखेर पेट्रोल-डिझेलच्या व्हॅटमध्ये कपात करण्याचा निर्णय राज्य सरकारने रविवारी (दि. २२) घेतला.

**इंधन दरकपात करताना केंद्र सरकारने दोन लाख २० हजार कोटी रुपयांचा आर्थिक भार घेतला असताना किमान महाराष्ट्राच्या आर्थिक लौकिकाला साजेशी घोषणा अपेक्षित होती. देशाच्या जीडीपीमध्ये आपला वाटा १५ टक्के आहे. त्यामुळे इंधन दरकपातीत किमान १० टक्के भार तर राज्य सरकारने घ्यायचा, पण नाही. याला म्हणतात 'उंटाच्या तोंडात जिरे'!**

**-देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्षनेते महाराष्ट्र विधानसभा**

## आफ्रिकेविरुद्धच्या टी-२० मालिकेसाठी युवांना संधी

### दिनेश, कुलदीपचे पुनरागमन ▌ इंग्लंडविरुद्ध कसोटीसाठी वरिष्ठ खेळाडूंना पसंती

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएलचे यंदाचे पर्व शेवटच्या टप्प्यात आहे. यानंतर भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात पाच सामन्यांची टी-२० मालिका आणि इंग्लंडसोबतच्या कसोटी मालिकेचे वेध लागले आहेत. या दोन्ही मालिकांसाठी राष्ट्रीय निवड समितीने रविवारी (दि. २२) भारतीय संघाची निवड केली आहे.

अपेक्षेनुसार दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या मालिकेसाठी काही वरिष्ठ खेळाडूंना विश्रांती देण्यात आली आहे, तर काही खेळाडूंचे पुनरागमन झाले आहे. आयपीएलमध्ये चमकदार कामगिरी करणाऱ्या काही युवा खेळाडूंनाही बीसीसीआयने संधी दिली आहे. या मालिकेसाठी भारतीय संघाचे कर्णधारपद केएल राहुलकडे सोपविण्यात आले आहे.

रोहित शर्मा व विराट कोहली हे दोन्ही प्रमुख खेळाडू यंदाच्या आयपीएलमध्ये त्यांच्या फॉर्मशी झगडताना दिसले. रोहितने शनिवारी झालेल्या सामन्यानंतर बीसीसीआयकडे विश्रांती मिळावी, अशी विनंती केली होती आणि ती मान्य करण्यात आली. रोहित, विराट यांच्यासह जसप्रीत बुमराहलाही विश्रांती देण्यात आलेली आहे. सूर्यकुमार यादव, रवींद्र जडेजा व दीपक चहर हे दुखापतीतून सावरलेले नाहीत आणि त्यामुळे त्यांची निवड झालेली नाही. आयपीएलमध्ये पंजाब किंग्सचा अर्षदीप सिंग व सनरायझर्स हैदराबादचा उमरान मलिक यांनी चांगली कामगिरी केली आहे. त्यामुळे त्यांना पदार्पणाची संधी देण्यात आली आहे. कुलदीप यादव व दिनेश कार्तिक याचे कमबॅक सुखावणारे आहे.

यानंतर येत्या १ ते ५ जुलैदरम्यान एजबॅस्टन, बर्मिंगहॅम येथे इंग्लंडविरोधात पुनर्निर्धारित पाचवा कसोटी सामना खेळवला जाणार आहे. या संघात वरिष्ठ खेळाडूंना पसंती देण्यात आलीय.

**भारताचा टी-२० संघ :** केएल राहुल (कर्णधार), ऋतुराज गायकवाड, इशान किशन, दीपक हुडा, श्रेयस अय्यर, ऋषभ पंत (उपकर्णधार, यष्टीरक्षक), दिनेश कार्तिक (यष्टीरक्षक), हार्दिक पांड्या, व्यंकटेश अय्यर, युझवेंद्र चहल, कुलदीप यादव, अक्षर पटेल, रवी बिश्नोई, भुवनेश्वर कुमार, हर्षल पटेल, आवेश खान, अर्शदीप सिंग, उमरान मलिक.

**भारताचा कसोटी संघ :** रोहित शर्मा (कर्णधार), केएल राहुल (उपकर्णधार) शुभमन गिल, विराट कोहली, श्रेयस अय्यर, हनुमा विहारी, चेतेश्वर पुजारा, ऋषभ पंत व केएस भरत (यष्टीरक्षक), रवींद्र जडेजा, रविचंद्रन अश्विन, शार्दुल ठाकूर, मोहम्मद शमी, जसप्रीत बुमराह, मोहम्मद सिराज, उमेश यादव, प्रसिध कृष्णा.

## भिवंडीत अवैध कफ सिरप जप्त

**भिवंडी : प्रतिनिधी**

अमली पदार्थविरोधी विभागाने (एनसीबी) ठाणे जिल्ह्यातील भिवंडी येथे केलेल्या छापेमारीत अवैधपणे विक्रीस नेण्यात येणाऱ्या कोडीन आधारित कफ सिरपचा साठा पकडण्यात आला. या प्रकरणी दोघांना अटक केली असून त्यांच्याकडून ८६४ किलो (८६४० बाटल्या) कोडीन आधारित कफ सिरप आणि वाहने जप्त करण्यात आली आहेत. जप्त केलेल्या या बाटल्यांची किंमत अंदाजे ३५ लाख रुपये इतकी आहे.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे एनसीबी मुंबईच्या पथकाने भिवंडीजवळ आग्रा-मुंबई महामार्गावर पाळत ठेवली आणि एक बोलेरो पिकअप अडवली. या वाहनाची झडती घेतली असता त्यात ६० बॉक्समध्ये एकूण ८६४ किलो (८६४० बाटल्या) कोडीन आधारित कफ सिरप पद्धतशीरपणे भरलेले आढळले. एनसीबीने हे सर्व जप्त केले. जप्त केलेल्या औषधांची वाहतूक करणाऱ्याला तत्काळ ताब्यात घेण्यात आले. एनसीबीने वाहकाची अधिक चौकशी केली असता मिळालेल्या माहितीच्या आधारे दोन तासांनंतर रिसिव्हरला पकडण्यासाठी सापळा रचण्यात आला. सुमारे दोन किमी पायी पाठलाग केल्यानंतर त्याला पकडण्यात आले.

## सोलापूरमध्ये भीषण अपघातात डॉक्टर दाम्पत्यासह सहा जण ठार

**सोलापूर : प्रतिनिधी**

सोलापूर जिल्ह्याच्या मोहोळ तालुक्यातील पेनुरजवळ सेलेरियो आणि स्कॉर्पिओ या दोन वाहनांचा भीषण अपघात होऊन डॉक्टर दाम्पत्यासह सहा जण जागीच ठार झाल्याची घटना रविवारी (दि. २२) दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास घडली.

मोहोळ येथील मागील तीन पिढ्यांपासून वैद्यकीय व्यवसायात असलेल्या कुटुंबातील डॉ. अफरीन आतार (वय ३०) हे कुटुंबीय व नातेवाईकांसह कौटुंबिक कारणानिमित्त स्वतःच्या सेलेरियो गाडीने बाहेरगावी गेले होते. रविवार ते गावी परत येत असताना त्यांच्या गाडीला पेनुरजवळील माळी पाटीजवळ मोहोळहून पंढरपूरकडे निघालेल्या स्कॉर्पिओ गाडीने समोरासमोर जोराची धडक दिली.



या अपघातात डॉ. अफरीन आतार (वय ३०), त्यांचे पती मुजाहीद ईमाम आतार (३५), मुलगा अरमान मुजाहीद आतार (५) यांच्यासह डॉ. अफरीन यांचे बंधू इरफान नुरखाँ खान, त्यांची पत्नी बेनझीर इरफान खान, मुलगी अनाया इरफान खान असे सहा जण जागीच ठार झाले, तर डॉ. आफरीन यांचा मुलगा अरहान (८) याच्यासह दुसऱ्या वाहनातील अनिल हुंडेकरी (३५), मनीषा मोहन हुंडेकरी, राजेंद्र हुंडेकरी, रामचंद्र शेटे व मंदाकिनी शेटे (सर्व रा. गादेगाव, ता. पंढरपूर) जखमी असून त्यातील दोघांची प्रकृती चिंताजनक आहे. जखमींना पुढील उपचारासाठी सोलापूरला हलविण्यात आले आहे. दरम्यान, अपघाताची माहिती पोलीस घेत असून पुढील कार्यवाही सुरू आहे.

# यांत्रिकी नौकांना मासेमारी बंदी

## ▮ खोल समुद्रात जाण्यास मज्जाव; आठ दिवसांत हंगाम थांबणार

**अलिबाग : प्रतिनिधी**

सागरातील माश्यांचे जनत व्हावे या उद्देशाने कोकण किनारपट्टीवर मत्स्य प्रजनन काळात यांत्रिकी नौकांना मासेमारी करण्यास बंदी घालण्यात आली आहे. १ जुन ते ३१ जुलै या कालावधीत हे बंदी आदेश कायम राहणार आहेत. सहाय्यक मत्सव्यवसाय विभागाने हे आदेश जारी केले आहेत.

दरम्यान या कालावधीमध्ये मासळी व सागरी प्राण्यांचे मोठ्या प्रमाणात प्रजनन होत असते. तसेच समुद्रात नद्यांव्दारे मोठ्या प्रमाणात खनिजद्रव्ये वाहत जातात. त्याचप्रमाणे क्षारांचे प्रमाण कमी होते आणि अपवेलिंगमुळे देखील समुद्राच्या तळातील मुलद्रव्ये पाण्याच्या वरच्या थरात येतात. त्यामुळे प्लवंग निर्मिती मोठ्या प्रमाणावर होऊन मासळीच्या लहान जीवांना पोषक वातावरण तयार होते. परिणामी मासळीच्या साठ्याचे जतन होते. त्याशिवाय या कालावधीत वादळी हवामान असल्याने जिवीत व वित्तहानी होण्याची शक्यता असते. त्यापासून मच्छिमारांचे संरक्षण व्हावे या हेतूने वरील कालावधीत यांत्रिक मासेमारी नौकांना मासेमारीस बंदी घालण्यात आलेली आहे.



**▪ रायगड जिल्ह्यात साडेतीन हजार यांत्रिकी नौका**

***रायगड जिल्ह्यात साडेतीन हजार यांत्रिकी नौका आहेत. या नौकांवर जवळपास तीस ते पस्तीस हजार लोक काम करतात. या सर्वांसाठी हे आदेश जारी करण्यात आले आहेत. बंदी आदेश लागू असेपर्यंत मच्छीमारांनी मासेमारीसाठी खोल समुद्रात जाऊ नये असे आवाहन करण्यात आले आहे.***

या बंदी कालावधीत सागरी कायद्याचा भंग करुन मासेमारी करणाऱ्या मच्छिमारांविरुध्द कारवाई करण्याचा इशारा मत्स्यव्यवसाय विभागाने दिला आहे. १ जून ते ३१ जुलै २०२२ या कालावधीत यांत्रिक नौका मासेमारीस गेल्या असता अपघात झाल्यास त्यासंबंधीची कोणतीही नुकसान भरपाई शासनाकडून मिळणार नाही. नौका पुनर्वसनासंबंधीचा प्रस्ताव विचारात घेण्यात येणार नाही. बंदी कालावधीत अपघाताने मच्छिमारांवर मृत्यू ओढवल्यास त्यांच्या वारसांना कोणत्याही प्रकारची मदत/अर्थसहाय्य शासनाकडून मंजूर केले जाणार नाही. बंदी कालावधीत ज्या मासेमार संस्थांच्या सभासदांच्या नौका मासेमारी करताना आढळतील त्या संस्थांचे राष्ट्रीय सहकार विकास निगम योजनेखाली पुरस्कृत केलेले अर्ज अर्थसहाय्य मंजुरीसाठी शिफारस केले जाणार नाहीत.

तसेच शासनाच्या कोणत्याही अर्थसहाय्याच्या योजनांचा लाभ संस्थेच्या कोणत्याही सभासदास अनुज्ञेय राहणार नाही. बंदी कालावधीत बेकायदेशीर मासेमारी करणाऱ्या नौका मालकांविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल असा इशारा मत्स्यव्यवसाय विभागाने जारी केलेल्या पत्रकात देण्यात आला आहे.

# म्हसळा तालुक्यात आरोग्य यंत्रणेचे तीनतेरा

**म्हसळा : प्रतिनिधी**

म्हसळा तालुक्यात आरोग्य सेवेसाठी शहरातील एक ग्रामीण रुग्णालय, म्हसळा, मेंदडी आणि खामगाव येथे प्राथमिक आरोग्य केंद्र आणि पाभरे येथे एक जिल्हा परिषद दवाखाना अशी राज्य शासन आरोग्य व जिल्हा परिषद आरोग्य विभागाची यंत्रणा तालुक्यातील ८० गावांसाठी कार्यरत आहे. परंतु योग्य आणि आवश्यक वैद्यकीय सेवा, यंत्रणा, अद्ययावत सामुग्रीचा अभाव यामुळे जनतेला आरोग्य सेवा कमी पडत असल्याच्या सततच्या तक्रारी होत आहेत.

ग्रामीण रुग्णालय आणि प्राथमिक आरोग्य केंद्रातील स्थानिक वैद्यकीय अधिकारी यांनी २४ तास रुग्णसेवा करण्याचे अभिप्रेत असताना बहुतांश वैद्यकीय अधिकारी हे अनेक वेळा गैरहजर असतात. म्हसळा, मेंदडी आणि खामगाव येथे तीन प्राथमिक आरोग्य केंद्र आणि पाभरे येथे एक जिल्हा परिषद दवाखाना यांचा जानेवारी २०२२ ते १५ मेपर्यंतच्या रुग्णसंख्येबाबत माहिती घेतली असता म्हसळा प्राथमिक आरोग्य केंद्र रुग्ण ३१९ (सर्पदंश, विंचू दंश, लूज मोशन एकही रुग्ण नाही), खामगाव प्राथमिक आरोग्य केंद्र रुग्ण १,६१५ (सर्पदंश एक, विंचूदंश, लूज मोशन ४४), मेंदडी प्राथमिक आरोग्य केंद्र रुग्ण १,६९४ (विंचू दंश पाच, लूज मोशन ३७) पाभरे जिल्हा परिषद दवाखाना रुग्ण ३,६४७ (सर्प दंश सहा, विंचू दंश १३, लूज मोशन १४६) अशी रुग्णसंख्या आहे.

तुलनात्मकरित्या म्हसळा, मेंदडी आणि खामगाव या तीन प्राथमिक आरोग्य केंद्रांतून सहा वैद्यकीय अधिकारी आणि इतर यांची संख्या जास्त असूनही त्या तीनही प्राथमिक आरोग्य केंद्रातून जानेवारी ते मे या ४ ते ५ महिन्यात केवळ ३,६२८ रुग्णांना सेवा मिळाली तर पाभरे येथे वैद्यकीय अधिकारी एक आणि एक शिपाई असा केवळ ४० टक्के स्टाफ असताना रुग्ण ३,६४७, सर्पदंश सहा, विंचू दंश १३, लूज मोशन १४६ अशी रुग्णसेवा झाली आहे.



**❝ म्हसळा शहरात ग्रामीण रुग्णालय सुरू होण्याच्या अगोदरच म्हसळा शहरातील प्राथमिक आरोग्य केंद्र पाभरे येथे स्थलांतरीत व्हावे. पाभरे येथील जि. प. दवाखाना आंबेत खाडीपट्टा परिसरात व्हावा असा रितसर प्रस्ताव दिलेला आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी शासनाचे लक्ष वेधून तत्काळ निर्णय घेणे जरुरीचे होते. अनावश्यक होणारा खर्च, आवश्यक सेवा न मिळणे याला जिल्हा परिषद प्रशासन जबाबदार आहे.**
**–महादेव पाटील, माजी सभापती पं.स. म्हसळा**

म्हसळा प्राथमिक आरोग्य केंद्रांर्तगत जांभूळ, नेवरुळ, तळवडे ही तीन उपकेंद्र सुमारे १६ हजार लोकसंख्या असूनही म्हसळा प्राथमिक आरोग्य केंद्रातून चार ते पाच महिन्यात केवळ ३१९ रुग्णांना सेवा मिळाली याचा अर्थ म्हसळा प्राथमिक आरोग्य केंद्रातून होणारे रुग्णसेवेचे काम निष्क्रीय आणि सुमार दर्जाचे आहे. वास्तविक पाहता म्हसळा शहरात २५ मे २०१४ ला ग्रामीण रुग्णालयाचे उद्घाटन आणि कार्यरत झाले. त्याच शहरात तब्बल आठ वर्ष जिल्हा परिषद आरोग्य विभागाने म्हसळा प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत सेवा कार्यरत ठेऊन आठ वर्षात सुमारे चार ते पाच कोटी रुपये खर्च करून समांतरीत सेवा दिली.

वास्तविक पाहता म्हसळा शहरात ग्रामीण रुग्णालय सुरू होण्याच्या अगोदर रुग्णसेवा समिती, पंचायत समिती, जिल्हा परिषद आरोग्य समिती, आणि जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेत म्हसळा प्राथमिक आरोग्य केंद्र पाभरे येथे स्थलांतरीत करण्याबाबत ठराव होऊनही ते गेले आठ वर्षांत स्थलांतरीत का करण्यात आले नाही हा चर्चेचा विषय होत आहे. दरम्यान आरोग्य सेवेकडे लक्ष देण्याची मागणी होत आहे.

# नवी मुंबईतील अवैध धंद्यांची चौकशी करा

## देवेंद्र फडणवीस यांची मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबईमध्ये सऱ्हास अनधिकृत धंदे होत असल्याच्या तक्रारीचे निवेदन बेलापुरच्या आमदार मंदा म्हात्रे यांच्याकडून आपल्याला प्राप्त झाले आहे. त्या निवेदनाच्या पार्श्वभूमीवर सदर अनधिकृत धंद्यांची चौकशी करून त्वरित कारवाई व्हावी अशी मागणी राज्याचे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी गृहमंत्री दिलीप वळसे–पाटील यांना पाठवलेल्या पत्रात केली आहे.



या निवेदनात नवी मुंबईत विविध ठिकाणी मटका, लॉटरी, जुगार, गोमांस तस्करी, अवैध दारू विक्री, डीझेल चोरी, गुटखा विक्री, रात्री दोन वाजेपर्यंत बार व पब सुरु ठेवणे, मसाज पार्लरच्या नावाखाली देहविक्री, लालचंदन तस्करी यासारखे अनेक धंदे राजरोसपणे केले जात आहेत. नवी मुंबईत विविध ठिकाणी रस्त्यावर, हायवेवर रसायनांनी भरलेल्या शेकडो गाड्या अनधिकृतपणे पार्किंगच्या नावाखाली उभ्या असून पोलीस विभाग या सर्वांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचे पत्रात म्हटले आहे.

नवी मुंबईतील उपनगरात चोऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. महिला अत्याचार, ऑनलाईन गंडा असे अनेक गुन्हे घडत असून पोलीस आयुक्त तसेच वाहतूक विभागाचे उपायुक्त यांचे या सर्व गोष्टींवर नियंत्रण नाही.

शहरात करोडो रुपयांचा गैरव्यवहार होत असताना सामान्य नागरिकांना वेठीस धरण्याचे कामही पोलीस विभाग करीत आहे.

दरम्यान, पोलिसांच्या सर्वच विभागात मनमानी कारभार सुरु असून याची दखल आपण त्वरित घ्यावी, असे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी गृहमंत्री दिलीप वळसे–पाटील यांना पाठविलेल्या एका निवेदनाद्वारे म्हटले आहे.

# हिंदू–मुस्लिम एकता वृद्धिंगत व्हावी : डॉ. कुमार सप्तर्षी

**पुणे : प्रतिनिधी**

माणसाला जोडतो, तो धर्म आणि माणसाला माणसापासून तोडतो, तो अधर्म होय. भारताच्या भूमीत बंधुभाव आहे. सर्व धर्मातील चांगल्या कल्पना आपण स्वीकारल्या पाहिजे. द्वेष वाढवून देश टिकणार नाही. हिंदू–मुस्लिम एकता वृद्धिंगत होणे गरजेचे असून त्यासाठी त्यांना एकत्र आणणारे कार्यक्रम झाले पाहिजे, असे मत युवक क्रांती दल आणि महाराष्ट्र गांधी स्मारक निधीचे अध्यक्ष डॉ. कुमार सप्तर्षी यांनी व्यक्त केले.



‘जमाते इस्लामी हिंद, पुणे’तर्फे ईद मिलन कार्यक्रम आणि ‘धर्म, अधर्म आणि धार्मिकता’ या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. या परिसंवादात डॉ. सप्तर्षी बोलत होते. ख्रिश्चन धर्मगुरू रेव्हरंड चित्रलेखा जेम्स आणि जमाते इस्लामी हिंदचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष तौफीक अस्लम खान हे या परिसंवादात सहभागी झाले होते.

तौफीक अस्लम खान म्हणाले, जोपर्यंत शिक्षण होत नाही, तोपर्यंत प्रगती, जागृती होणार नाही. सर्व धर्मांची माहिती होण्यासाठी भेटीगाठी होत राहिल्या पाहिजे. भारतातील विविधता हीच मोठी शक्ती आहे. चित्रलेखा जेम्स म्हणाल्या, शाश्वत जीवन जगायचे असेल इतरांचा कळवळा आला पाहिजे. ज्याला इतरांचा कळवळा येणार नाही, त्याला धर्म कळणार नाही. देवावर आपण जेवढे प्रेम करतो, तेवढे शेजाऱ्यांवर केले पाहिजे. भारतातील आजच्या परिस्थितीत धार्मिकतेचा अर्थ परिपूर्ण न्याय हा असला पाहिजे. परिसंवादानंतर शिरखुर्म्याचा आस्वाद घेऊन कार्यक्रमाचा समारोप झाला. करीमुद्दीन शेख यांनी सर्वांचे आभार मानले.

# कर्नाटकातून पुण्यात जाणारा पावणेदोन कोटींचा गुटखा जप्त

**सोलापूर : प्रतिनिधी**

कर्नाटकातून आलेला बेकायदा गुटखा पुण्याकडे जात असताना उत्तर सोलापूर तालुक्यातील पाकणी येथे पकडण्यात आला. तालुका पोलिसांनी कंटेनरसह पावणेदोन कोटीचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. धोंडीराम पवार आणि इस्माईल शेख अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत.

गुटखा गुलबर्गा येथून तुळजापूरच्या दिशेने जात असल्याची माहिती प्रशिक्षणार्थी सहायक पोलीस अधीक्षक सत्यसाई कार्तिक यांना मिळाली होती. मिळालेल्या माहितीवरून मंद्रुपकडून येणाऱ्या दोन्ही कंटेनरचा पाठलाग करण्यात आला. दोन्ही कंटेनरला कोंडी येथील पाकणीजवळ थांबविण्यात आले. कंटेनरमधील चालकाकडे विचारणा केली असता, दोघांनी उडवाउडवीची उत्तरे दिली.



कंटेनरच्या चालकाचा संशय आल्याने या कंटेनरची पोलिसांनी पाहणी केली. आतमध्ये पांढऱ्या रंगाच्या पोत्यामध्ये गुटखासदृश माल भरलेला असल्याचे दिसून आले.

दोन्ही कंटेनर सोलापूर तालुका पोलीस ठाणे येथे नेऊन पाहणी करण्यात आली. यात गुटखा, सुगंधी तंबाखूची ८०० पोती आढळून आली. एक कोटी ४५ लाख ७४ हजार रुपये किमतीचा गुटखा आणि ४५ लाखाचे दोन कंटेनर पोलिसांकडून जप्त करण्यात आले आहे.

# पुणे येथे सराफी पेढीवर भरदिवसा दरोडा

**पुणे : प्रतिनिधी**

सराफी पेढीत शिरून सराफावर शस्त्राने वार करून पसार झालेल्या चोरट्याला भारती विद्यापीठ पोलिसांनी पकडले आहे.

गौरव रायकर (वय २५, रा. पोकळे वस्ती, धायरी ) असे अटक केलेल्या चोरट्याचे नाव आहे. विनोदकुमार सोनी (वय ४२, रा. आंबेगाव बुद्रूक) यांनी याबाबत फिर्याद दिली होती. कात्रज परिसरातील आंबेगाव बुद्रुकमध्ये सोनी यांचे वैभवलक्ष्मी ज्वेलर्स सराफी पेढी आहे. दोन दिवसांपूर्वी रायकर आणि त्याच्याबरोबर असलेले साथीदार खरेदीच्या बहाण्याने सराफी पेढीत शिरले. सराफ व्यावसायिक सोनी यांच्यावर चाकूने वार केले. पेढीतील दागिने लुटण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. सोनी यांनी प्रसंगावधान राखून आरडाओरडा केल्याने चोरटे दुचाकीवरून पसार झाले.

पोलिसांनी सराफी पेढीतील सीसीटीव्ही कॅमेऱ्याने केलेले चित्रीकरण तपासासाठी ताब्यात घेतले होते. संशयित चोरटा रायकर धायरी परिसरात थांबल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने त्याला पकडले. पोलीस उपायुक्त सागर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक जगन्नाथ कळसकर, सहायक निरीक्षक वैभव गायकवाड, उपनिरीक्षक नितीन शिंदे, धीरज गुप्ता, रवींद्र चिप्पा, गणेश भोसले, आकाश फासगे आदिंनी ही कारवाई केली.

# उद्धव ठाकरे यांची हिंदुत्वाबरोबर गद्दारी

## केंद्रीय मंत्री नारायण राणेंची टीका

**सिंधुदुर्ग : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी हिंदुत्वाशी गद्दारी केली आणि शरद पवारांच्या मांडीला मांडी लावली. कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी सोबत फक्त मुख्यमंत्री पदासाठी उद्धव ठाकरे गेले आहेत, अशी टीका केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर केली आहे. सिंधुदुर्गमधील मालवण येथे नारायण राणे बोलत होते.

नारायण राणे म्हणाले, मराठी माणसाच्या न्याय हक्कांसाठी झगडणारी शिवसेना असे बाळासाहेब ठाकरे यांनी सांगितले म्हणून आम्ही वयाच्या १५ व्या वर्षी शिवसेनेत गेलो. बाळासाहेब असतानाची तेव्हाची भूमिका आणि आताची उद्धव ठाकरे असतानाची शिवसेनेची भूमिका वेगळी आहेत. मराठी माणूस सत्तेत कुठे आहे. शिवसैनिकांना मुख्यमंत्री भेटतात का? आमदारांना भेटतात का? मुख्यमंत्री कुणालाही भेटत नाहीत. फक्त ते काचेच्या मातोश्रीत आहेत. कॅबिनेटला ते मंत्रालयात जात नाहीत.

कालानगरच्या नाक्यांवर बोलतात तसे एकदाच विधिमंडळात मुख्यमंत्री बोलले. परवा बीकेसीमध्ये भाषण केले, फक्त शिव्या घातल्या. हा तसा आहे, तो तसा आहे, आताच हॉस्पिटलमधून आल्यासारखा उद्धव ठाकरेंचा चेहरा वाटतो. आम्ही कुणाच्या चेहऱ्यावर, शरीरावर बोलत नाही. सुंदर चेहऱ्यावर केव्हाच बोलत नाही. दुसऱ्याच्या दिसण्यावर बोलण्यापेक्षा विकासावर बोला, प्रगतीबद्दल बोला असा टोला नारायण राणे यांनी यावेळी लगावला.

नारायण राणे म्हणाले, मुख्यमंत्री उद्धव ठाकरे म्हणाले, मी महाराष्ट्र भर फिरणार, त्यावर मला हसायला आले शिवसैनिकांना भेटायला महाराष्ट्रभर फिरणार. मुख्यमंत्र्यांचे डॉक्टर माझे मित्र आहेत. त्यांना फोन करून तुमचे पेशंट चालू शकतात का? असं विचारले तर डॉक्टर म्हणाले वीस मिनिट चालू शकतात. त्यावर चालू शकत नाहीत. अडीच वर्षात मुख्यमंत्र्यांनी एक विकासाचे जनहिताचे काम केले तर सांगावे आणि मग बढाया माराव्यात. शेतकऱ्यांना ५० हजार रूपये नुकसान भरपाई द्यावी अशी भूमिका आमचे सरकार असताना होती. यांनी एक रुपया तरी दिला का? मुंबईत १९६० साली ७० टक्के मराठी लोक राहत होते. आता केवळ २८ टक्के मराठी लोकवस्ती आहे.

दरडोई उत्पनात गुजरात, तामिळनाडू, गोवा महाराष्ट्राच्या पुढे गेले आहेत. देशातील एक नंबर असलेले राज्य यांना चालवता येत नाही. एकीकडे प्रगती सुरू असताना शिवसेना प्रगतीच्या आड येत आहे, अशी टीका राणे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर केली. यावेळी त्यांनी खासदार निनायक राऊत यांच्यावरही टीका केली. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील चिपी विमानतळ पाहणीसाठी गेलो होतो. तेव्हा तिथे दिवसा दिसणारा रात्री न दिसणारा खासदार आंदोलन करत होता, असे राणे यांनी म्हटले. राणेंनी शिवसेनेवर यावेळी कडाडून टीका केली.

# उंटाच्या तोंडात जिरे! व्हॅट कमी केल्यानंतर फडणवीसांची टीका

**मुंबई : प्रतिनिधी**

केंद्र सरकारपाठोपाठ राज्यातील महाविकास आघाडी सरकारनं पेट्रोल–डिझेलवरील व्हॅटमध्ये कपात करण्याचा निर्णय जाहीर केला आहे. यावरुन विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली आहे. सरकारचा हा निर्णय म्हणजे उंटाच्या तोंडात जिरे असा शब्दप्रयोग करीत त्यांनी सरकारला फटकारले आहे.

इंधन दरकपात करताना केंद्र सरकारने २ लाख २० हजार कोटी रुपयांचा आर्थिक भार घेतला असताना किमान महाराष्ट्राच्या आर्थिक लौकिकाला साजेशी घोषणा अपेक्षित होती. देशाच्या जीडीपीमध्ये आपला वाटा १५ टक्के आहे. त्यामुळं इंधन दरकपातीत किमान १० टक्के भार तर राज्य सरकारने घ्यायचा, पण तसे नाही याला म्हणतात उंटाच्या तोंडात जिरे, अशा शब्दांत विरोधी पक्षनेते फडणवीस यांनी ठाकरे सरकारवर सडकून टीका केली आहे.





पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
सोमवार, दि. २३ मे २०२२ रोजी होणारे
कोरोना प्रतिबंधक लसीकरण
(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड | कोव्हॅक्सिन | कार्बेव्हॅक्स

सर्व केंद्रांवर (वयोगट : १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी–१, गावदेवी पाडा, पनवेल ▪ २. रोटरी क्लब, से. १९, नवीन पनवेल
- ३. यूपीएचसी–४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी–५, डी–मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी–६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे ▪ ६. टाटा अॅडव्हान्स सेंटर, खारघर
- ७. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- ८. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल

**Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पूर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.**

## निवडक

### व्यावसायिकाची ३९ लाखांची फसवणूक

**पनवेल** : कमी दरात सोन्याचे बिस्कीट देतो असे सांगून एका व्यावसायिकाची ३९ लाखांची फसवणूक झाल्याची घटना खारघरमध्ये घडली. मिलिंद वटारे (वय ४९) रा. पुणे यांना कमी दरात सोन्याचे बिस्कीट देतो असे सांगून खारघर येथे जाऊन एक किलो वजनाचे सोन्याचे बिस्कीट दाखवून त्यांच्याकडून ३९ लाख रुपये रोख घेतले. त्यानंतर सोन्याचे बिस्कीट न देता पोलिसांची रेड झाल्याचे भासवून काही अज्ञात चोरट्यांनी त्यांची फसवणूक करून, रक्कम घेऊन ते पसार झाले. याबाबतची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### कळंबोलीतून तरुणी बेपत्ता

**पनवेल** : कळंबोली वसाहतीमध्ये राहणारी एक २४ वर्षीय तरुणी कोणास काही एक न सांगता निघून गेल्याने ती हरवल्याची तक्रार कळंबोली पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. कोमल सुनील चव्हाण (वय २४), उंची ५ फूट ४ इंच, केस काळे, रंग गोरा, अंगामध्ये लाल कुर्ता आणि काळा लेहेंगा घातला आहे. या तरुणीबाबत कोणाला माहिती असल्यास कळंबोली पोलीस ठाणे किंवा महिला पोलीस नाईक रेखा देसाई यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### ४६ वर्षीय व्यक्तीचा पोलिसांकडून शोध

**पनवेल** : एक ४६ वर्षीय व्यक्ती राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता कोठे तरी निघून गेल्याने ते हरवल्याची तक्रार कळंबोली पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. देविदास भिकाजी दवणे असे त्यांचे नाव असून उंची ५ फूट ६ इंच, केस काळे-पांढरे, रंग सावळा असून डाव्या दंडावर देवीचे चित्र गोंदलेले आहे, तसेच अंगात जांभळा लाईनिंग असलेला शर्ट आणि काळी साधी पँट घातली आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास कळंबोली पोलीस ठाणे किंवा महिला पोलीस नाईक रेखा देसाई यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### 'जयंती महोत्सवासाठी अनुदान मिळावे'

**पनवेल** : पनवेलमधील अण्णाभाऊ साठे दलित सेवा संस्थेच्या वतीने साहित्यरत्न लोकशाहिर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती महात्सवाचे आयोजन १ ऑगस्ट रोजी केले आहे. त्यासाठी महापालिकेकडून पाच लाखांचे अनुदान मिळावे, अशी मागणी संस्थेतर्फे करण्यात आली आहे. तशा आशयाचे निवेदनही आयुक्त गणेश देशमुख यांना देण्यात आले आहे. साहित्यरत्न लोकशाहिर अण्णाभाऊ साठे यांची जयंती दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येते. या वर्षीच्या जयंती महोत्सवासाठी पनवेल महापालिकेकडून पाच लाखांचे अनुदान मिळावे यासाठी अखिल भारतीय मातंग संघ व अण्णाभाऊ साठे दलित सेवा संघाच्या वतीने आयुक्त गणेश देशमुख यांना निवेदन देण्यात आले आहे.

# सोनारीत रस्त्यांचे कॉँक्रीटीकरण


## आमदार महेश बालदी यांचा पुढाकार; ग्रामस्थांनी मानले आभार

**उरण : प्रतिनिधी**

जेएनपीटी बंदर प्रशासनाने उरण तालुक्यातील सोनारी ग्रामपंचायत हद्दीतील अंतर्गत रस्त्यांचे नव्याने कॉँक्रीटीकरण करण्याचे काम हाती घेतले आहे. खड्डेमय रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी उरणचे आमदार महेश बालदी यांनी पुढाकार घेतल्याने पावसाळ्यापूर्वी रस्त्यांच्या कॉँक्रीटीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. त्यामुळे सोनारी गावातील ग्रामस्थांनी या कॉँक्रीटीकराणाच्या कामाबाबत समाधान व्यक्त केले आहे.



जेएनपीटी बंदराच्या प्रवेशद्वाराजवळ असलेल्या सोनारी ग्रामपंचायत हद्दीतील अंतर्गत रस्त्यांची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली होती. त्यांचा त्रास हा गावातील रहिवाशांना सहन करावा लागत होता. याचे गांभीर्य तातडीने लक्षात घेऊन सोनारी ग्रामपंचायतीच्या सरपंच पूनम कडू, सोनारी गावचे तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष दिनेश तांडेल, ज्येष्ठ नागरिक नरेश कडू यांनी गावकऱ्यांच्या मदतीने आमदार महेश बालदी यांच्या मार्गदर्शनाखाली जेएनपीटी बंदर प्रशासनाकडे सोनारी ग्रामपंचायत हद्दीतील अंतर्गत रस्त्यांचे पावसाळ्यापूर्वी कॉँक्रीटीकरण करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली होती.



या मागणीची दखल जेएनपीटी बंदर प्रशासनाने घेऊन सोनारी ग्रामपंचायत हद्दीतील भालचंद्र यशवंत कडू ते शोभा रविंद्र म्हात्रे, मधुकर पांडुरंग तांडेल ते नरेश यशवंत कडू, प्रथमेश कडू ते अमर पाटील आणि रमेश कडू ते विजय कडू यांच्या घराजवळील अंतर्गत रस्त्यांचे नव्याने कॉँक्रीटीकरण करण्याचे काम हाती घेऊन पूर्णत्वास नेले आहे.

पावसाळ्यापूर्वी या रस्त्यांचे नव्याने कॉँक्रीटीकरणाचे काम पूर्ण केल्याने सरपंच पूनम कडू तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष दिनेश तांडेल, ज्येष्ठ नागरिक नरेश कडू यांनी सोनारी ग्रामस्थांच्या वतीने बंदर प्रशासनांचे व आमदार महेश बालदी यांचे विशेष आभार व्यक्त केले आहेत.



पनवेल : महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांनी गिरवले येथील आत्माराम बाळाराम हातमोडे यांचा ज्येष्ठ पुत्र प्रथमेश याच्या लग्नसोहळ्यानिमित्त रविवारी भेट देऊन शुभेच्छा दिल्या. सोबत अनेश ढवळे व अन्य मान्यवर.



पनवेल : महानगरपालिकेचे कामोठे येथील नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांच्या नगरसेवक निधीतून रविवारी विविध सोसायट्यांना दिव्यांगांच्या हस्ते डस्टबिनचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास ॲड. आशा भगत, आदित्य भगत, अमेय भगत, आप्पा भगत, भाजप कामोठे सरचिटणीस शरद जगताप, शिक्षक सेलचे रोहन अहिवळे, गणेश गवळी, प्रवीण शेळके, दिव्यांग सेल संयोजक गणेश शिरिशकार, संदीप ठाकूर, दक्षता बाजीराव जाधव आदी उपस्थित होते. या वेळी रहिवाशांना पुस्तकांचेही वाटप करण्यात आले.

# जागतिक किर्तीचे डॉ. प्रेमानंद रामाणी यांच्या जीवनावर चित्रपट

## 'ताठ कणा'च्या स्पेशल स्क्रिनिंग शोसाठी मान्यवरांची उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जागतिक किर्तीचे न्यूरो सर्जन डॉ. प्रेमानंद रामाणी यांच्या जीवनावर आधारित लवकरच प्रदर्शित होणाऱ्या 'ताठ कणा' या चित्रपटाचा स्पेशल स्क्रिनिंग शो शनिवारी (दि. २१) रात्री मुंबईत आयोजित करण्यात आला होता. या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची उपस्थिती लाभली. त्यांचे स्वागत करण्यात आले.

अतिशय गरीब परिस्थितीत जन्म घेऊन, पण ध्येयवेडे होऊन डॉ. रामाणी यांनी आपले शिक्षण पूर्ण केले आणि आवडी-निवडी न पाहता संशोधनाला महत्त्व दिले. त्यांचे नाव आज जागतिक पातळीवर गाजत आहे. मीसुद्धा त्यांच्याकडे उपचार घेतले असून माझ्या जीवनात बदल झालेला आहे. ही किमया डॉ. रामाणी यांनी केली आहे, असे सांगून त्यांच्या आयुष्यावर आधारित चित्रपटासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी चित्रपटाला शुभेच्छा दिल्या.

डॉ. पी. एस. रामाणी हे भारतातील सर्वांत मोठे न्यूरो सर्जन आहेत. त्यांनी पाठीचा कणा ताठ करण्यासाठी प्लिफ नावाची अख्या जगभरातून पहिली सर्जरी शोधून काढली आहे. अशा या व्यक्तीच्या जीवनावर ताठ कणा हा चित्रपट आहे.

या चित्रपटाचे दिग्दर्शक गिरीश मोहित आणि निर्माते विजय मुदशिंगीकर असून अभिनेता उमेश कामत याने प्रमुख भूमिका साकारली आहे. या चित्रपटाबद्दल उत्सुकता आहे.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे स्वागत





रक्तदान शिबिर



**पनवेल : खारघरमधील युवा प्रेरणा सामाजिक संस्थेच्या वतीने अध्यक्ष किरण पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून टाटा कॅन्सर हॉस्पिटलच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन रविवारी रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल येथे करण्यात आले होते. या शिबिराला महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट दिली. या वेळी त्यांच्या हस्ते रक्तदात्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. भाजप खारघर तळोजा मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल, नगरसेवक रामजी बेरा, आयोजक नगरसेविका नेत्रा किरण पाटील, भाजप खारघर तळोजा मंडल उपाध्यक्ष दिलीप जाधव, सरचिटणीस दीपक शिंदे, व्यापारी सेल अध्यक्ष अंबाबाई पटेल, युवा नेते समीर कदम, राजकुमार चौधरी, शोभा मिश्रा, मोना अडवाणी, विलास आळेकर, भरत कोंढाळकर, गोपाळ राजपूत, कुणाल देवकर, वैभव शेजवळ, आदित्य हाटगे, अनिकेत कातोरे, मंजू चोप्रा आदी उपस्थित होते.**

# खांदा वसाहतीत नालेसफाईला सुरुवात

## पावसाळ्यापूर्वी कामे पूर्ण करण्याच्या उपमहापौर सीताताई पाटील यांच्या सूचना

**पनवेल : वार्ताहर**

वारंवार पाठपुरावा केल्यामुळे शेवटी खांदा वसाहतीमध्ये गुरुवारपासून (दि. १९) नालेसफाईला सुरुवात झाली. पनवेल महापालिकेकडून हे काम हाती घेण्यात आले. पाऊस सुरू होण्याच्या अगोदर युद्धपातळीवर सर्व नाल्यातील गाळ आणि माती काढून पावसाच्या पाण्याला वाट करून द्या, अशा सूचना उपमहापौर सीताताई पाटील यांनी केल्या.



नवीन पनवेल नोडचा पश्चिम भाग असलेल्या खांदा वसाहतीमध्ये जवळपास २५ किमी. लांबीचे पावसाळी नाले आहेत. २६ जुलै २००५ला वसाहतीमध्ये मोठ्या प्रमाणात जीवित व वित्तहानी झाली. त्यानंतर सिडकोकडून मान्सूनपूर्व नालेसफाई सुरू झाली, मात्र ज्या पद्धतीने साफसफाई होणे आवश्यक आहे, तशी न करता फक्त दाखवण्यासाठी हे सफाई करण्यात येत असल्याचे अनेकदा उघड झाले आहे. म्हणून उपमहापौर सिताताई पाटील यांनी सिडकोची नालेसफाई कशी फोल ठरली, हे अनेकदा ऐन पावसाळ्यात अधिकाऱ्यांना बोलावून दाखवून दिले आहे. गेल्या वर्षीही पावसाळ्यात त्रेधातिरपीट उडाली असल्याने यंदा योग्य आणि चांगल्या पद्धतीने नालेसफाई करण्यात यावी, असा आग्रह उपमहापौर पाटील यांनी धरला.

पनवेल महापालिका या वर्षी सिडको हद्दीत मान्सूनपूर्व कामे करणार असल्याचे अगोदरच ठरले होते. या पार्श्वभूमीवर योग्य आणि वेळेत नालेसफाई व्हावी यासाठी उपमहापौरांनी पुढाकार घेतला आहे, जेणेकरून पावसाळ्यात पाण्याचा निचरा होऊन जनजीवन विस्कळीत होणार नाही असा मुद्दा त्यांनी उपस्थित केला आहे. या आशयाचे पत्र त्यांनी आयुक्त गणेश देशमुख यांनासुद्धा दिले होते. त्याचबरोबर महापौर डॉ. कविता चौतमोल आणि सभागृह नेते परेश ठाकूर यांना पत्राची प्रत देण्यात आले होते. त्यानुसार प्रशासनाने दखल घेऊन गुरुवारपासून खांदा वसाहतीत नालेसफाईला सुरुवात केली. नुकतेच उपमहापौर सीताताई पाटील यांच्यासह ज्येष्ठ नगरसेवक एकनाथ गायकवाड, अभिषेक भोपी यांनी प्रत्यक्ष जाऊन कामाची पाहणी केली.

### नाल्यातील माती वेळेत उचला

*सिडकोकडून होत असलेल्या नालेसफाईमध्ये आतमधून काढलेली माती बाजूला टाकण्यात येते आणि तीच माती पुन्हा नाल्यात जाते. त्यामुळे पावसाळ्यात पाण्याला अडथळा निर्माण होतो. मागील गोष्टींचा धडा घेऊन महापालिकेने नालेसफाई केल्यानंतर त्वरित ही माती त्याचबरोबर कचरा उचलून टाकावा, अशा सूचना उपमहापौर सीताताई पाटील यांनी या वेळी केल्या.*

# मनोज आव्हाडच्या मारेकऱ्यांना फाशी द्या

## अखिल भारतीय मातंग संघाची मागणी

**पनवेल : रामप्रह वृत्त**

औरंगाबाद येथील मनोज आव्हाड या युवकाचा निर्घुणपणे खून करणाऱ्या आरोपींचा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालवून त्यांना फाशीची शिक्षा देण्याची मागणी अखिल भारतीय मातंग संघ रायगड यांच्यातर्फे करण्यात आली आहे. याबाबत त्यांनी पनवेल विभागीय अधिकारी व तहसीलदारांना निवेदन दिले आहे.

औरंगाबाद येथील मनोज शेषराव आव्हाड या तरुणाला २० एप्रिल २०२२ रोजी म्हाडा कॉलनी, शहा बाजार चंपा चौक येथे आठ जणांनी निर्घृणपणे लोखंडी रॉड व हॉकीस्टिकने मारहाण करून हत्या केली. या प्रकरणी आठ जणांविरोधात औरंगाबाद शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांना अटक करण्यात आली आहे. या सर्वांना फाशीची शिक्षा देण्यात यावी, तसेच मनोजच्या घरची परिस्थिती हलाखीची असल्याने विशेष बाब म्हणून आव्हाड परिवाराला २५ लाख रुपये मदत व परिवारातील एकाला शासकीय नोकरीत सामावून घेण्यात यावे, अशी मागणी मातंग समाजाच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबतचे निवेदन पनवेल विभागीय अधिकारी व तहसीलदारांना देण्यात आले आहे.

या वेळी संघाचे महासचिव एस. जी. कुंडले, वरिष्ठ सामाजिक कार्यकर्ते रमेश तुपे, पनवेल तालुकाध्यक्ष भानुदास वाघमारे, शहर सचिव संतोष ढोबळे, शहर मंडळ अध्यक्ष शांताराम कोळी व सदस्य उपस्थित होते.

# मॉर्निंग वॉकला गेलेल्या महिलेला लुटले

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भिंगारी गावातील अंगणवाडी सेविकेच्या गळ्यातील ४० हजार रुपये किमतीचे सोन्याचे गंथण खेचून पलायन केल्याची घटना शुक्रवारी (दि. २०) सकाळी घडली. पनवेल शहर पोलिसांनी या घटनेतील दोघा चोरट्यांविरोधात जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.



पनवेलमधील भिंगारी गावात शारदा शिंदे (४९) या पती व मुलासह राहण्यास असून त्या गावात अंगणवाडी सेविका म्हणून काम करतात. त्या दरदिवशी सकाळी आपल्या जावेसह मॉर्निंग वॉकसाठी जातात. शुक्रवारी सकाळी त्या दोघीही ६.१५ वाजण्याच्या सुमारास मॉर्निंग वॉक करून घरी परतत होत्या. त्या वेळी त्यांच्या समोरून मोटरसायकलवरून आलेल्या दोघा चोरट्यांपैकी पाठीमागे बसलेल्या एकाने शारदा यांच्या गळ्यातील ४० हजार रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र खेचले. त्यानंतर दोघांनी मोटरसायकलवरून पलायन केले.

चोरट्यांनी डोक्यात हेल्मेट घातले असल्याने, तसेच तोंडाला मास्क लावल्यामुळे त्यांचा चेहरा पाहता आला नाही, असे शिंदे यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रारीत म्हटले आहे. दुचाकीवरून येऊन महिलांना लुटण्याचे प्रकार वाढत असल्याने महिलांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून त्वरीत कारवाईची मागणी होत आहे.



# जेएनपीए महामार्गावर भरधाव ट्रेलरला अपघात

**उरण : प्रतिनिधी**

पनवेल- जेएनपीए महामार्गावरून जेएनपीए बंदराकडे जाणाऱ्या भरधाव वेगातील ट्रेलरला अपघात झाल्याची घटना रविवारी (दि. २२) पहाटेच्या सुमारास घडली आहे. या अपघातात चालक किरकोळ जखमी झाला आहे.

जेएनपीए परिसरातील रस्त्यांवर सध्या बेधडकपणे अवजड वाहने पार्किंग करण्यात येत आहेत. त्यामुळे ही वाहने अपघातास कारणीभूत ठरत आहेत. रविवारी पहाटेच्या सुमारास पनवेल- जेएनपीए महामार्गावरून जेएनपीए बंदराकडे जाणाऱ्या भरधाव वेगातील ट्रेलरने पागोटे गावाजवळील महामार्गावर पार्किंग करणाऱ्या ट्रेलरला धडक दिल्याने झालेल्या अपघातात वाहनचालक किरकोळ जखमी झाला आहे. अपघातास कारणीभूत ठरत असलेल्या बेकायदा पार्किंगवर वाहतूक पोलिसांनी कारवाई करावी, अशी मागणी प्रवासी करीत आहेत.

## संपादकीय

# केंद्राचा सर्वसामान्यांना दिलासा

केंद्रातील मोदी सरकारने पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्क कमी करण्याची घोषणा केली. त्याचबरोबर प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेच्या नऊ कोटींहून अधिक लाभार्थ्यांना घरगुती एलपीजी सिलिंडरवर २०० रुपयांची सबसिडी जाहीर केली. याशिवाय वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर विविध निर्णय घेत उपाययोजना केल्या आहेत. त्यामुळे देशातील सर्वसामान्य नागरिकांना फार मोठा दिलासा मिळाला आहे.

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकार गोरगरिबांच्या कल्याणासाठी समर्पित भावनेने काम करीत आहे. या सरकारने गरीब आणि मध्यमवर्गाचे जीवनमान सुकर व्हावे यासाठी वेळोवेळी अनेक पावले उचललीत. त्यामुळे देशवासीयांनीही सलग दुसऱ्यांदा पंतप्रधान मोदींना काम करण्याची संधी दिली आहे. ज्या ज्या वेळी देशावर कोणते संकट आले त्यावेळी पंतप्रधान मोदींनी संकटमोचक बनून पुढे होत परिस्थिती नियंत्रणात आणल्याचा इतिहास आहे. नुकत्याच सरलेल्या वैश्विक महामारी कोरोना संसर्गाच्या वेळीही त्याचा प्रत्यय सर्वांना आला. कोरोनामुळे विस्कटलेली जागतिक अर्थव्यवस्थेची घडी अद्यापही पूर्ववत होऊ शकलेली नाही. त्यातच रशिया आणि युक्रेन युद्धाचा पुरवठा साखळीवर परिणाम झाला आहे. त्यातून महागाई वाढली. या महागाईवरच मोदी सरकारने सर्जिकल स्ट्राइक केला. पेट्रोलवरील केंद्रीय उत्पादन शुल्क प्रतिलिटर आठ रुपये, तर डिझेलवर सहा रुपयांनी कमी करीत असल्याची घोषणा केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी शनिवारी केली. त्यामुळे पेट्रोल नऊ रुपये ५० पैशांनी, तर डिझेल सात रुपयांनी स्वस्त होणार आहे. त्याचबरोबर पंतप्रधान उज्ज्वला योजनेच्या नऊ कोटींहून अधिक लाभार्थ्यांना प्रति गॅस सिलिंडर (१२ सिलिंडरपर्यंत) २०० रुपये सबसिडी देण्यात येणार आहे. याशिवाय अर्थसंकल्पात १.०५ लाख कोटींच्या खत अनुदानाव्यतिरिक्त १.१० लाख कोटींची अतिरिक्त रक्कम शेतकऱ्यांना दिली जात आहे. प्लास्टिक उत्पादनांसाठी सरकार कच्चा माल आणि मध्यस्थांवरील सीमाशुल्क कमी करीत आहे. पोलादाच्या काही कच्च्या मालावरील आयात शुल्कही कमी, तर काही उत्पादनांवर निर्यात शुल्क आकारले जाईल असे सीतारामन यांनी सांगितले. एकूणच मोदी सरकारने देशातील सर्वसामान्यांचा दिलासा दिला आहे. आता देशातील उर्वरित राज्य सरकारांनीही एक पाऊल पुढे टाकले पाहिजे. पेट्रोल-डिझेलच्या वाढत्या किमतीचा बोजा कमी करण्यासाठी केंद्र सरकारने उत्पादन शुल्क नोव्हेंबर महिन्यात कमी केले होते. त्याचप्रमाणे राज्य सरकारांनीही कर कमी करावेत, असे आवाहन करण्यात आले होते. त्याला प्रतिसाद देत काही राज्यांनी कर कमी केलेही, मात्र काही राज्यांनी कर कमी केले नाहीत. या राज्यांनी कर कमी न केल्याने तेथील नागरिकांना अधिक दराने पेट्रोल आणि डिझेल खरेदी करावे लागत आहे. आता तरी त्यांनी कर कमी करून आपापल्या राज्यातील नागरिकांना दिलासा देणे आवश्यक आहे. नाहीतर केवळ केंद्र सरकारच्या नावाने बोटे मोडून काय मतलब. केंद्र सरकार आपल्या पातळीवर खूप काही करीत आहे तेव्हा राज्य सरकारांनीही आपल्या राज्यातील नागरिकांच्या हिताचा विचार करावा. केंद्राच्या आवाहनानंतर अखेर केरळ, राजस्थान आणि महाराष्ट्रातही करकपात करण्यात आली आहे. यासाठी त्यांनी एवढा वेळ लावला नसता, तर यापूर्वीच या राज्यांतील नागरिकांना दिलासा मिळाला असता.**

# गिरीस्थान माथेरानमध्ये ई-रिक्षा शाप की वरदान?

**खबरबात**
संतोष पेरणे



माथेरानमध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर तीन महिन्यासाठी ई-रिक्षा चालविली जाणार आहे. दहा वर्षांपूर्वी माथेरान श्रमिक रिक्षा संघटनेने माथेरानमधील शालेय मुलांचा मुद्दा पुढे करीत ई-रिक्षाला परवानगी द्यावी अशी मागणी केली होती. त्यासाठी सर्व न्यायालयांमध्ये धाव घेतल्यानंतर काही दिवसांपूर्वी ई-रिक्षाला सरकारकडून परवानगी दिली आहे. मात्र माथेरामध्ये या वाहनांबाबत वेगवेगळे मतप्रवाह आहेत. त्यात घोडा हे येथील वाहतुकीचे प्रमुख साधन असून त्या घोड्यांवर गदा येण्याची शक्यता आहे हेही लक्षात घ्यायला हवे.

माथेरानमधील ई-रिक्षा संदर्भात अश्वपाल संघटनेचे महत्त्वपूर्ण हरकतीचे मुद्दे असे होते. यामध्ये थंड हवेचे नैसर्गिक ठिकाण तसेच वाहनबंदी असलेले आशिया खंडातील एकमेव पर्यटन स्थळ अशी आजमितीस ओळख व सुप्रसिद्ध असणाऱ्या माथेरान या पर्यटन स्थळासाठी सुप्रीम कोर्टाकडून इको फ्रेंडली ई-रिक्षा प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्याची परवानगी मिळाली आहे. नाण्याला कधी पण दोन बाजू असतात. पुष्कळदा आपल्याला जी बाजू हवी आहे, तीच लोकांना व शासकीय यंत्रणेना दाखविली जाते. अशा वेळेस सामान्य जनतेच्या अस्तित्वाची व अस्मितेची दुसरी बाजू पण जनतेच्या व सन्माननीय न्यायालयाच्या समोर वेळेत येणे गरजेचे आहे. ई-रिक्षामुळे जर स्थनिकांना फक्त तात्पुरता २५ ते ३० टक्के फायदा होत असेल आणि दीर्घ काळात ७० ते ७५ टक्के स्थनिकांचे नुकसान होत असेल आणि अस्तित्वच संपुष्टात येणार आहे.

नाण्याची दुसरी बाजू पण तपासण्याची मागणी जोर धरत आहे. यामध्ये ई-रिक्षामुळे एक दिवसाचे पर्यटन होण्याची दाट शक्यता आहे. अनेकदा, पर्यटक संपूर्ण दिवसासाठी ई-रिक्षाचे प्रवासी भाडे ठरवून माथेरानचे सकाळी सात पॉईंट्स व दुपारनंतर १२ पॉईंट्स बघत सूर्यास्त बघून दस्तुरीला जाऊन येतात. एक दिवसाची ई-रिक्षा सफर करण्याची परिणामी पर्यटकांचे फक्त एक दिवसांचे पर्यटन होऊन अनेकांचे आर्थिक नुकसान होण्याची दाट शक्यता स्थानिकांकडून व अश्वचालकांकडून वर्तविले जात आहे. त्यामुळे एका दिवसाच्या पर्यटनामुळे लॉजधारक व हॉटेल मालक यांच्या उत्पन्नात जवळपास ५०% ते ६० टक्के इतकी प्रचंड घट होण्याचीही दाट शक्यता वर्तविली जात आहे. ई-रिक्षाला परवानगी देणे अथवा बिनशर्त परवानगी देणे म्हणजे परंपरागत हातरिक्षा मजुरांवर, अश्वमालक व अश्वचालकांवर तसेच कष्टकरी हमाल यांच्यावर पूर्णपणे अन्याय होणार आहे.

दैनंदिन हमाली करून रोजीरोटी मिळविणाऱ्या गरीब कुटुंबाची पुर्णतः बेरोजगारी जाऊन उपासमारी होण्याची दाट शक्यता आहे. तसेच पॉईटच्या मध्यवर्ती असलेल्या रस्त्यावरील स्टॉलधारकांची पण उपासमारी होईल. आशिया खंडातील एकमेव वाहन मुक्त नैसर्गिक निसर्गरम्य पर्यटन स्थळ अशी माथेरानची ओळख नाहीशी होऊन माथेरानचे वेगळेपण संपुष्टात येणार असेही म्हणणे आहे. माथेरानचा शोध सन १८५० रोजी ठाण्याचे तत्कालीन जिल्हाधिकारी ह्युज पॉइत्ज मॅलेट यांनी लावला. सन १८५४ रोजी त्यांनी माथेरानमधील पहिला बंगला बांधला. त्या स्वतःच्या बंगल्याचे नाव त्यांनी 'द बाईक' असे त्यांच्या घोडीचे नाव दिले. माथेरान या वाहनबंदी असलेल्या पर्यटन स्थळाचे वाहन हे 'घोडा' हेच आहे हे त्यांना अभिप्रेत होते. वाहनबंदी असल्याने घोडा व हातरिक्षा हेच येथील परंपरागत पर्यटनाचे वाहन व वैशिष्ट्ये आहे.

अनेक पर्यटक माथेरानला खास निसर्गरम्य वातावरणात चालण्यासाठी येतात. माथेरानच्या नैसर्गिक वातावरणात रमतगमत पायी चालण्याचा तसेच गाणी गात व गप्पा मारत चालण्याची पर्यटकांची मजा ई-रिक्षाने नाहीशी होणार आहे. माथेरानला पायी रमत गमत चालत निसर्गाचा आस्वाद घेत चालणारे पर्यटक रस्त्यात येणाऱ्या लहान दुकानदार, स्टॉलधारक यांच्या दुकानातून विविध वस्तू खरेदी करत प्रत्येक पॉईंटला जात आस्वाद घेत असतात. यामुळे पर्यटनामुळे सर्वांना उपजीविकेचे साधन उपलब्ध होते. ई-रिक्षात एकदा पर्यटक बसला तर तो थेट पॉईंटला उतरणार असल्याने यामधील स्टॉलधारकांचेही अतोनात नुकसान होणार आहे.

माथेरान या निसर्गरम्य, नैसर्गिक व ऑक्सिजन युक्त वातावरणात पायी चालल्याने शरीराला आपसूक व्यायाम मिळून शरीर सुदृढ व सशक्त राहण्यास मदत होते. 'आरोग्यम धनसंपदा' असा पायी चालण्याने जो लाभ मिळतो तो ई-रिक्षाने नष्ट होईल. तसेच जवळपास तीन किंवा सहा प्रवासी जर या ई-रिक्षात बसले तर किमान तीन ते कमाल सहा घोड्यावाल्यांची वर्दी ई-रिक्षा पळविणार आहे. त्यामुळे अनेकवेळा ई-रिक्षात बसलेले प्रवासी मोजणे हेच काम या घोडेवाल्यांच्या, हमालांच्या व स्टॉल वाल्यांच्या नशिबी येणार अशी नाराजी आहे.

कोर्टामध्ये याचिकेकर्ते यांची बाजू मांडणारे अधिवक्ता ललित मोहन म्हणाले की, २१ व्या शतकातही समाजाचा एक भाग अजूनही गुलामगिरी करत आहे आणि हातरिक्षा ओढत आहे. यामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे. हातरिक्षा स्वतःच्या मर्जीनुसार आणि कोणाचीही जबरदस्ती नसताना घटनेने दिलेल्या काम करण्याच्या अधिकारानुसार हातरिक्षा ओढून अर्थाजन करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे म्हणजे गुलामगिरी ठरत नाही असे हातरिक्षा वाल्यांचे म्हणणे आहे. साधारण ८० ते १०० किलो वजनाचा हातरिक्षातील भार हे एकूण ३ श्रमिक खेचत असतात. त्यामुळे व चाकांमुळे तो भार विभागला जाऊन नगण्य असतो. त्यात आता पेव्हर ब्लॉकचे रस्ते होत असल्याने विनासायास हातरिक्षा सहज ओढली जात आहे. याउलट, माथेरानला वाहनबंदी असल्याने घरोघरीचा, हॉटेल्स, मार्केट इत्यादी ठिकाणचा दैनंदिन सुका व ओला कचरा हा मानवी श्रमातून मोठ्या हात गाडीतून कर्मचारी खेचत असतात.

तसेच माथेरानला गटारे, मोऱ्या, इत्यादी पायाभूत सुविधांसाठी पण जवळपास एक टन ते दीड टनापर्यंत अवजड साहित्य मानवी श्रमाने खेचले जाते. मग इतके वजनदार दुर्गंधीयुक्त घनकचरा व अवजड साहित्य हाताने मानवी श्रमाने खेचणे हे ही गुलामगिरी ठरेल. आणि यासाठी पर्यायी वाहन व्यवस्था MOEF च्या ४(न) या अधिसूचनेला डावलून करणे इष्ट ठरणार नाही तशी चर्चा होत आहे. जर हातरिक्षा ओढणे ही गुलामगिरी असेल तर दुर्गंधीयुक्त घनकचरा तसेच अवजड साहित्य हातगाडीने मानवी श्रमाद्वारे ओढणे याला ही आपण गुलामगिरी म्हणू शकतो का? मुळात, स्वेच्छेने काम करण्याचा अधिकार घटनेने भारतातील प्रत्येक व्यक्तीस दिलेला आहे, त्याप्रमाणे स्वतःच्या व कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठीमेहनतीचे अधिकृत काम स्वतःच्या मर्जीने करणे, म्हणजे गुन्हा किंवा गुलामगिरी ठरू शकते का? याचा ही फेरविचार होणे न्यायिक ठरेल आणि तसे मत व्यक्त होत आहे.

तसेच स्थानिक अश्वपाल संघटना, दैनंदिन मजुरी करून अर्थाजन करणारे हमाल व हातमजुर श्रमिक यांची प्रत्यक्ष मते सन्माननीय सुप्रीम न्यायालयाने त्यांना या खटल्यात प्रतिवादी म्हणून सामील करून नाण्याची दुसरी बाजू ऐकून घेणे, खऱ्या अर्थाने न्यायिक ठरेल असे बोलले जात आहे. याचिका कर्ते सुनील शिंदे यांनी सुरुवातीला सन २०१२ च्या सुमारास स्वतःच्या नावाने ई रिक्षा यासंदर्भात अपील केले होते तेव्हा वरील सर्व संघटनेची मते जाणून घेण्यात आली होती. दरम्यान ई-रिक्षाची तात्पुरती परवानगी देताना माथेरानमधील रस्ते यांची सध्याची स्थिती, तीव्र व अतितीव्र चढउतार यांची पाहणी समितीने करावी असेही मत आहे. तसेच ई-रिक्षा 'व्हेईकल' म्हणून गणली जात असल्याने, नियमानुसार माथेरानच्या रस्त्यांसाठी RTO कडून संमतीपत्र मिळणे क्रमप्राप्त आहे. ते अजून न मिळता ई-रिक्षा माथेरानला चालवणे नियमबाह्य ठरण्याची शक्यता तपासणे गरजेचे आहे. उलटपक्षी, सर्वात महत्वाचे म्हणजे माथेरान मधील रिक्षाचालक हे दैनंदिन हातमजूरी करून उदरनिर्वाह करणारे असल्याने, जवळपास २ ते ५ लाखापर्यंतची ई-रिक्षाची खरेदी करणे व नंतर त्यावर नियमित देखभाल खर्च करणे परवडण्यासारखे नक्कीच नाही.

माथेरानमधील जवळपास ९०टक्के चालक व मालक यांच्याकडे साधा दुचाकी अथवा चारचाकी चालविण्याचे 'ड्रायव्हिंग लायसन्स' नाही आहे. साधी दुचाकी किंवा चारचाकी चालविण्यासाठी 'ड्रायव्हिंग लायसन्स' काढणे गरजेचे असते. ई-रिक्षा चालविण्याचा कोणताही अनुभव नसताना ते ई-रिक्षा कसे काय चालवू शकतात. याचा विचार व्हावा असेही मुद्दे यानिमित्ताने पुढे येत आहेत.

## बदलते तंत्रज्ञान

# एसी वापराबद्दलच्या टिप्स

एसीच्या लोकप्रियतेमुळे त्यांच्या वापराबाबत जागरूकताही तेवढीच वाढली आहे. मात्र अजूनही काही गोष्टी आहेत की ज्या तुम्हाला एअर कंडिशनरबद्दल माहित नसतील. अशा काही बाबी आज प्रकार टाकण्यात येत आहे. एअर कंडिशनर्स हे उन्हाळ्यात विशेषतः भारतात सर्वाधिक वापरल्या जाणाऱ्या घरगुती उपकरणांपैकी एक आहे. आधुनिक एसी तुलनेने शक्तिशाली आणि ऊर्जा कार्यक्षम असल्याने या उपकरणाच्या विक्रीत गेल्या काही वर्षांत प्रचंड वाढ झाली आहे. एसी चालू



असताना सीलिंग फॅन मध्यम गतीवर ठेवल्यास खोली लवकर थंड होण्यास मदत होते. एसी चालू असताना सीलिंग फॅन कमी किंवा मध्यम वेगाने चालू केल्याने खोली लवकर थंड होण्यास मदत होते. एकदा तुम्ही तुमचे एसीचे तापमान एका लेव्हलला सेट केल्यानंतर, थंड हवा खोलीत पसरविण्यासाठी पंखा देखील चालू केला पाहिजे. हे लक्षात घ्या की, एसी चालू असताना जास्त वेगाने खोलीत पंखे वापरणे प्रतिकूल असू शकते कारण खोली थंड होण्यासाठी आवश्यकतेपेक्षा जास्त वेळ लागू शकतो.

एसीच्या ऊर्जेची कार्यक्षमता दर काही वर्षांनी बदलते. भारतात ऋतूचक्रावर आधारे एसीच्या तापमानाचे मोजमाप केले जाते. हे कुलिंग सीझनल टोटल लोड आणि कुलिंग सीझनल एनर्जी कन्झम्पशनचे गुणोत्तर आहे. सोप्या शब्दात सांगायचे झाले तर, ते एका वर्षात वापरल्या जाणाऱ्या एकूण ऊर्जेशी एसी काढून टाकू शकणाऱ्या वार्षिक उष्णतेचे प्रमाण आहे. कोणत्याही एसीचे तापमान २४ अंश ते ४३ अंश सेल्सिअस दरम्यान एसी बाहेरील तापमानावर आधारित सरासरी मोजली जाते. अशा प्रकारे दर काही वर्षांनी एसीचे तापमान बदलते. याचा अर्थ असा की, तुमचा पाच-स्टार एसी पुढील वर्षी पाच-स्टार एसी राहिलंच याची काही शाश्वती नसते. कमी तापमानात थर्मोस्टॅट सेट करणे म्हणजे चांगले कुलिंग झाले असे नव्हे. लोकांचा असा विश्वास आहे की जेव्हा तापमानाची सेटिंग कमी होते तेव्हा एसी अधिक चांगले कुलिंग देते. मात्र तसे होत नाही. ब्युरो ऑफ एनर्जी इफिशियन्सी नुसार मानवी शरीरासाठी २४ अंश हे आदर्श तापमान आहे आणि सर्वात कमी तापमान सेटिंगच्या तुलनेत कोणताही एसी इतकं तापमान सेट करण्यासाठी कमी भार घेईल. एसी सूर्यप्रकाशापासून दूर ठेवल्याने तिची कार्यक्षमता वाढते. तुमची खोली थंड ठेवणे हे एसीचे काम असले तरी, एसीला शक्य तितके थंड ठेवले तर तिची कार्यक्षमता वाढू शकते. तुमचा एसी थेट सूर्यप्रकाशापासून दूर ठेवल्यास किंवा सावलीत ठेवल्याने जास्त गरम होण्यापासून वाचतो आणि त्यामुळे एसीला चांगले कुलिंग देणेदेखील सोपे होते.

# कासवांचे संवर्धन, जतन करणे काळाची गरज

**निमित्त**

जागतिक तापमानवाढीचा कासवांच्या प्रजोत्पादनावर दिवसेंदिवस परिणाम होत आहे. भविष्यात जगभरात नर कासवांची संख्या घटण्याची भीती व्यक्त केली जात आहे. नर कासवांची संख्या कमी झाल्यामुळे काही वर्षांनी कासवांची संख्या घटेल आणि त्याचा परिणाम समुद्रातील अन्नसाखळीवर होईल, असा एका निष्कर्ष अभ्यासातून पुढे आला आहे. जागतिक कासव दिन २३ मे रोजी साजरा होत असताना कासवांच्या भवितव्याविषयी चिंता व्यक्त करणारी माहिती या विषयातील संशोधनातून समोर आली आहे. या माहितीतून काही बोध घेणे गरजेचे आहे.

कायद्याने बंदी असूनही पकडून विक्री करण्याच्या गैरप्रकारांमुळे कासवांच्या संख्येमध्ये घट झाल्याचे वास्तव यापूर्वीच्या काळात होते. मात्र, आता जागतिक तापमानवाढीचा फटका कासव प्रजातीला बसण्याची भीती व्यक्त केली जात असल्याची माहिती सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वन्यजीव संरक्षक आणि देवगड महाविद्यालयातील प्राध्यापक नागेश दफ्तरदार यांनी अलिकडेच दिली आहे.

जगभरात सात प्रजातींचे कासव आढळतात. त्यापैकी भारताच्या म्हणजे पश्चिम किनारपट्टीला चार प्रजाती सापडतात. काही कासवाच्या प्रजाती वनस्पती किंवा शेवाळ्याची वाढ नियंत्रित ठेवण्यास मदत करतात. काही कासवे विषारी प्राण्यांवर नियंत्रण ठेवतात, तर काही प्रजातींचे कासव जेलीफिश खातात. जेलीफिश खाणारे कासव कमी झाले असल्याने जेलीफिशची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. याचाही प्रामुख्याने विचार होणे गरजेचे आहे. माशांची छोटी पिले खाणाऱ्या जेलीफिशमुळे माशांच्या संख्येवर परिणाम होत आहे. त्यामुळे मच्छीमारांना मासे मिळत नाहीत. अशा प्रकारे अन्नसाखळीवर परिणाम होत आहे. याकडे दफ्तरदार यांनी लक्ष वेधले आहे.

पर्यावरण साखळीतील कासवांना अभय देण्याच्या उद्देशातून कासवांचे संरक्षण आणि संवर्धन होत आहे. ओरिसामध्ये अरिबाडा येथे एका महिन्यात पाच-सहा लाख कासव येऊन घरटी करतात आणि अंडी घालतात. महाराष्ट्राच्या किनाऱ्यावर २०० ते ३०० घरटी होतात, अशी माहिती कासव संवर्धन क्षेत्रातील ज्येष्ठ कार्यकर्ते भाऊ काटदरे यांनी दिली. राज्यात २००० पासून सह्याद्री निसर्गमित्र फाउंडेशनच्या माध्यमातून कासव संवर्धनाचे काम सुरू केले.

रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यांमध्ये ३० ठिकाणी संरक्षणाचे काम हे वन विभाग आणि स्थानिक नागरिकांच्या हाती सुपूर्द करण्यात आले आहे, असे काटदरे यांनी यानिमित्ताने बोलताना सांगितले आहे.

वेळास येथे कासव महोत्सवाचे आयोजन करून स्थानिक नागरिकांना उत्पन्नाचा स्रोत निर्माण करून दिला आहे. कासवाची पिले बघायला आलेले पर्यटक तेथील घरी राहतात. त्यातून स्थानिकांना उत्पन्न मिळते. त्यामुळे आपल्या चरितार्थासाठी कासव जगले पाहिजे, हा संस्कार रुजला आहे याकडेही काटदरे यांनी लक्ष वेधले आहे.

संख्याघटीची अशी भीती-जमिनीवरचे कासव मातीत आणि समुद्रातील कासव वाळूमध्ये ५० ते ६० सेंटीमीटर खोलीमध्ये अंडी घालते. या घरट्याचे तापमान २७ अंशांपेक्षा जास्त असेल तर अंड्यातून ८० टक्के मादी कासवांची निर्मिती होते. तापमान २७ अंशांपेक्षा कमी असेल तर नर कासव तयार होतात. तापमान वाढत असल्यामुळे अंड्यांतून केवळ मादी कासवांची निर्मिती झाली आणि संयोगासाठी नर मिळाले नाहीत तर कासवांची संख्या घटण्याची भीती आहे.

तसेच जागतिक अभ्यासानुसार २१०० सालापर्यंत ३.७ अंश तापमान वाढण्याची शक्यता आहे. समुद्राचे तापमान वाढले तर कासवांची काही अंडी नष्ट होण्याचा धोका आहे. पिल्लांची संख्या कमी होऊन मादी कासवांची संख्या वाढण्याची शक्यता आहे. नर कासवच झाले नाहीत तर भविष्यात कासवांच्या संख्येवर परिणाम होईल. सध्यस्थितीत निसर्ग साखळी कुठेतही विस्कळीत होताना दिसून येत आहे. याकडे प्रामुख्याने लक्ष देणे काळाची गरज आहे.

**-विद्याधर कुलकर्णी**



**क्लिक...क्लिक...!**

**नदी असो वा समुद्र असो त्यात पोहण्याचा आनंद काही वेगळाच असतो. पोहता पोहता जाळे टाकून मच्छी पकडण्याचा आनंदही अनेक जण घेतात. असाच हा आनंद घेताना हे तरुण छायाचित्रात दिसत आहेत. (छाया : लक्ष्मण ठाकूर)**

## आरोग्य प्रहर

# जगभरात वेगाने पसरणारा मंकीपॉक्स

सध्या जगभरात कोरोना रूग्णसंख्या घटत असल्याने दिलासादायक बाब असताना आता मंकीपॉक्स या नव्या आजाराने डोके वर काढले आहे. मंकीपॉक्स नावाचा आजार जगभरात वेगाने पसरत आहे. या विषाणूने जगातील अनेक देशांमध्ये कहर केला आहे. हा आजार माकडांसारख्या संक्रमित जीवांपासून मानवामध्ये पसरत आहे. त्यामुळे या आजाराला मंकीपॉक्स असे नाव देण्यात आले आहे.

युरोप आणि उत्तर अमेरिकेत मंकीपॉक्सची अनेक



प्रकरणे आढळून आली असून यावर निदानाकरीता जागतिक आरोग्य संघटना याबाबतीत आरोग्य अधिकाऱ्यांशी समन्वय साधत आहेत. मंकीपॉक्स या आजाराबद्दल आज आपण जाणून घेणार आहोत. यामध्ये मंकीपॉक्स हा एक दुर्मिळ संसर्ग रोग आहे. १९५८मध्ये संशोधनासाठी ठेवलेल्या माकडांमध्ये याचा प्रथम शोध लागला होता. मंकीपॉक्सची पहिली मानवी केस १९७०मध्ये नोंदविली गेली होती. मंकीपॉक्स संक्रमित प्राण्याने घेतलेल्या चाव्यामुळे किंवा रक्त किंवा शरीरातील घटकांमुळे पसरते. उंदरांमुळेही हा रोग पसरत असल्याचे मानले जाते. सोबतच नीट न शिजविलेल्या संक्रमित प्राण्याचे मांस खाल्ल्यानेही हा आजार होण्याची शक्यता जास्त असते. आरोग्य तज्ज्ञांच्या मते, काही संसर्ग लैंगिक संपर्काद्वारेसुद्धा पसरतात. ताप, स्नायू दुखणे, थंडी वाजून येणे ही मानवांमध्ये मंकीपॉक्सची सामान्य लक्षणे आहेत. स्पेन आणि पोर्तुगालमध्ये ४०हून अधिक मंकीपॉक्सची प्रकरणे आढळल्यानंतर कॅनडातही मंकीपॉक्सची प्रकरणे आढळली आहेत. आता स्वीडन आणि इटलीमध्येही मंकीपॉक्स रुग्ण सापडले आहेत.

पोर्तुगाल, स्पेन, यूके, यूएससह अनेक देशांमध्ये मंकीपॉक्सची प्रकरणे नोंदविली गेली आहेत. ब्रिटननंतर अमेरिकेत पहिला रुग्ण आढळला. नुकतेच कॅनडातून परतलेल्या एका व्यक्तीला मंकीपॉक्स विषाणूची लागण झाल्याचे समोर आले आहे. अमेरिकेच्या मॅसॅच्युसेट्स सार्वजनिक आरोग्य विभागाने याबाबत माहिती दिली आहे. यूएस सेंटर्स फॉर डिसीज कंट्रोल अँड प्रिव्हेन्शन येथे नमुने तपासण्यात आले आहेत. युनायटेड स्टेट्समध्ये शुक्रवारी मंकीपॉक्सचा पहिला रुग्ण आढळला. आहे. कॅनडाला भेट दिल्यानंतर एका व्यक्तीने चाचणी केली यादरम्यान तो पॉझिटिव्ह आढळला. सहा मेपासून ब्रिटनमध्ये नऊ प्रकरणे सापडली आहे.

रोग नियंत्रण आणि प्रतिबंध केंद्रांनुसार नायजेरियामध्ये २०१७ मध्ये मंकीपॉक्स येण्यापुर्वी या आधी ४० वर्षे मंकीपॉक्सची कोणतीही नोंद झाली नव्हती. मॅंकीपॉक्सवर सध्या कोणतीही विशिष्ट उपचार नाही.

# घनकचऱ्यातून खतनिर्मिती प्रकल्प कागदावरच!

## माणगाव नगरपंचायतीचे दुर्लक्ष; परिसरात दुर्गंधीचे साम्राज्य

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यात औद्योगिकीकरण झपाट्याने वाढत असल्याने शहरीकरणही वाढत आहे. पर्यायाने शहरात दैनंदिन निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याचा प्रश्नही तितकाच गंभीर बनत चालला आहे. माणगाव नगरपंचायतीच्या हद्दीत निर्माण होणाऱ्या या घनकचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी माणगाव नगरपंचायतीपुढे मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.

मागील नगरपंचायत प्रशासनाने हा कचरा उचलण्यासाठी टेंडर काढून एका ठेकेदाराला हे काम दिले होते. हा कचरा काही कामगारांमार्फत उचलून तो डम्पिंग ग्राउंडवर टाकला जात होता. या कचऱ्याचे वर्गीकरण करून त्या कचऱ्याची योग्य ठिकाणी विल्हेवाट लावण्याचे प्रयोजन असताना हा कचरा उघड्यावर टाकल्याने तो अन्यत्र पसरून परिसरात रोगाची साथ येण्याची शक्यता असून नागरिकांचे तसेच जनावरांचेही आरोग्य धोक्यात येत आहे. यासाठी माणगाव नगरपंचायत या डम्पिंग ग्राउंडवर कचऱ्याचे वर्गीकरण करून खत निर्मिती करण्यासाठी कधी पाऊल टाकणार? असा सवाल नागरिकांतून उपस्थित होत आहे.

माणगाव नगरपंचायत २०१५च्या निवडणुकीत राष्ट्रवादीने नगरपंचायतीत सत्ता आल्यास माणगाव नगरी स्वच्छ व सुंदर करून खत निर्मिती प्रकल्प राबविण्याचे जाहिरनाम्यातून जाहीर केले होते. त्याची वचनपूर्ती कागदावरच राहिली. माणगाव नगरपंचायत ही शिवसेनेच्या ताब्यात असून शिवसेनेने तरी या घनकचऱ्याचे व्यवस्थापन शास्त्रीय पद्धतीने व्यवस्थापन करून या कचऱ्यापासून खतनिर्मिती करण्यासाठी महत्त्वपूर्ण पाउल टाकावे, अशी मागणी होत आहे.



### साथरोग पसरण्याची भीती

**तत्कालीन नगरपंचायत प्रशासनाने कचरा उचलण्याचे काम एका ठेकेदाराला दिले होते. त्या ठेकेदारामार्फत कर्मचारी नेमून हा कचरा गोळा केला जात होता, तसेच या कचऱ्याचे वर्गीकरण सुका, ओला, प्लास्टिक व बाटल्या बाजूला करून नगरपंचायतीच्या जागेतील पाच एकर असणाऱ्या डम्पिंग ग्राउंडवर विल्हेवाट लावून खत निर्मिती करावयाचे प्रयोजन होते. ते आश्वासन अखेर आश्वासनच ठरले. डम्पिंग ग्राउंडवर हा कचरा उघड्यावर टाकल्याने हा कचरा हवेने तसेच मोकाट जनावरांमार्फत परिसरात पसरत असल्याने साथरोग पसरण्याची भीती व्यक्त होत आहे.**

# पालीमध्ये स्वतंत्र भाजीमार्केटची मागणी

## रस्त्याच्या कडेला बसणाऱ्या व्यावसायिकांमुळे अपघाताचा धोका

**पाली : प्रतिनिधी**

पालीमध्ये परिसरातील आदिवासी बांधवांसह अनेक स्थानिक भाजीपाला व फळविक्रेते आपला व्यवसाय थाटून उदरनिर्वाह करीत आहेत, मात्र हे या व्यावसायिकांना स्वतंत्र भाजीमार्केटची सोय नसल्याने रस्त्याच्या कडेला जागा मिळेल तिथे बसून त्यांना आपला व्यवसाय करावा लागत आहे. त्यामुळे प्रशासनाने स्वतंत्र भाजीमार्केटची सोय करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

पालीमध्ये प्रामुख्याने बाजारपेठ, मिनिडोअर स्टँड ते पाली बसस्थानक, गांधी चौक, जुने एसटी स्टँड, मारुती मंदिर नाका व मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणात फळभाजी विक्रेते रस्त्याच्या कडेला विक्रीसाठी बसतात. रस्त्याच्या कडेला त्यांना पुरेशी जागादेखील नसते, मात्र नाईलाजाने त्यांना तिथे बसावे लागते. प्रामुख्याने आदिवासी महिला पहाटे लवकर गावाठी भाजीपाला, फुले, आंबे, काजूगर, कोकम, आंबे आणि रानमेवा घेऊन पालीकडे यायला निघतात. स्थानिक मच्छीमारदेखील गोड्या पाण्यातील मच्छी विक्रीसाठी आणतात. रस्त्याच्या कडेला एखाद्या झाडाखाली किंवा दुकानाच्या शेडखाली अथवा मग मोकळ्या जागेत या महिला विक्रीसाठी ठाण मांडतात. अशा परिस्थितीत विक्रेते आणि ग्राहकांची रस्त्याच्या बाजूला रेलचेल असते. त्यामुळे वाहतुकीवर परिणामदेखील होतो. त्यामुळे या विक्रेत्यांना शासनाकडून हक्काची जागा दिल्यास हे विक्रेते त्या ठिकाणी बसून आपला माल विकतील. वारंवार होणारी वाहतूक कोंडीही होणार नाही. या व्यावसायिकांसाठी स्वतंत्र भाजीमार्केटची निर्मिती करण्याची मागणी जोर धरीत आहे.

### मोक्याची जागा हवी

**पालीतील भाजीमार्केटची जागा फारशी मोठी नाही. तिथे काही थोडेच विक्रेते बसतात. रस्त्यावर विक्री करणाऱ्या फळभाजीपाला विक्रेत्यांना हक्काची जागा उपलब्ध करून द्यायची असेल तर त्यासाठी मोकळी व मोक्याची जागा आवश्यक आहे. शासकीय किंवा गावठाण जागेचा वापर यासाठी होऊ शकतो, मात्र त्यासाठी शासकिय व ग्रामपंचायतीची इच्छाशक्ती आणि त्याबरोबरच पुरेसा निधी आवश्यक आहे.**



# कर्जत शहरातील वाहतूक कोंडी सुटणार

## तहसीलदारांच्या बैठकीत निर्णय

**कर्जत : बातमीदार**

कर्जत शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी गेले तीन महिने कर्जत संघर्ष समितीने सातत्याने पाठपुरावा केला होता. त्या अनुषंगाने तहसीलदार विक्रम देशमुख यांनी संबंधित यंत्रणा आणि संघर्ष समिती यांची बैठक घेऊन वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी सकारात्मक निर्णय घेऊन कर्जतकरांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे.

कर्जत संघर्ष समितीने मागील तीन महिने सह्यांची मोहीम तसेच शासकीय अधिकारी यांच्या गाठीभेटी यावर चर्चा केली होती. त्या वेळी तहसीलदार विक्रम देशमुख यांनी कर्जत नगरपरिषद आणि पोलीस विभागासोबत बैठक लावण्याचे आश्वसन दिले होते. त्यानुसार कर्जत तहसील कार्यालयात तहसीलदार विक्रम देशमुख यांच्या दालनात झालेल्या बैठकीला तहसीलदार यांच्यासह पोलीस निरिकिश सुवर्णा पत्की, पालिकेचे कार्यालयीन प्रमुख गोसावी यांच्या उपस्थितीत आणि कर्जत संघर्ष समितीचे पदाधिकारी यांच्यासह बैठक घेतली. त्यावेळी शहरात होणाऱ्या वाहतूक कोंडी सोडविण्याबाबत चर्चा झाली.

शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकापासून रेल्वेस्टेशन रोडकडे जाणाऱ्या मार्गावर सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदी करण्यात येणार आहे. महावीर पेठ ते रेल्वेस्टेशन रोड मार्गावर एकतर्फा वाहतुक करण्यात येणार आहे, तसेच बाजारपेठेतील दुकानदारांनी बेकायदेशीर लावलेले रस्त्यावरील लोखंडी फलक, दुकानातील विक्रीच्या वस्तू दुकानाबाहेर ठेवण्यास बंदी करण्यात येणार आहे. त्यामुळे नागरिकांना दिलासा मिळणार आहे.

**अवजड वाहनांना सकाळी आठ ते रात्री आठ वाजेपर्यंत मुख्य बाजारपेठेत येण्यासदेखील बंदी करण्यात येणार आहे. लवकरच शुक्रवारचा बाजार पोलीस ग्राउंडवर स्थलांतरित केला जाणार आहे. याबाबतची सर्व माहिती कर्जत पोलीस स्टेशन आणि कर्जत नगर परिषद यांच्यामार्फत शहरवासीयांना देण्यात येणार आहे.**

# पेणमध्ये अल्पवयीन मुलीची गळफास घेऊन आत्महत्या

**पेण : प्रतिनिधी**

तालुक्यातील उंबर्डे गावातील १४ वर्षीय अल्पवयीन मुलीने आपल्या राहत्या घरी बुधवारी (दि. १८) गळफास घेऊन आत्महत्या केली. आर्या चंद्रकांत म्हात्रे असे आत्महत्या केलेल्या मुलीचे नाव आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, तक्रारदार पांडुरंग काशिनाथ म्हात्रे रा. उंबर्डे यांनी दिलेल्या माहितीनुसार, बुधवारी दुपारी २.३० वाजण्याच्या सुमारास आर्याची भावजय वेणू यांनी बराच वेळ आर्या बाहेर न आल्याने तिच्या खोलीचे दार ठोठावले मात्र प्रतिसाद न मिळाल्याने त्यांनी दरवाजा आजूबाजूच्या लोकांच्या मदतीने तोडून आत स्वयंपाक घरात प्रवेश करून पाहिले असता रूममध्ये आर्याने दोरीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले. याबाबत पेण पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूनुसार नोंद करण्यात आली असून पुढील तपास पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस हवालदार वाघमारे या करीत आहेत. अल्पवयीन मुलीच्या आत्महत्येचे कारण अजूनपर्यंत समजू शकलेले नाही.

# सावित्रीच्या लेकींसाठी भातपिक शेतीशाळा

**मुरूड : प्रतिनिधी**

तालुक्यांतील मौजे जोसरांजण येथे महिला शेतकऱ्यांची भातपिकाची शेतीशाळा शनिवारी (दि. २१) माजी सभापती आशिका ठाकूर यांच्या उपस्थितीत झाली. सावित्रीच्या लेकींनी दीपप्रज्वलन करून प्रतिज्ञा घेत कार्यशाळेचा शुभारंभ केला.



४० महिला शेतकऱ्यांचे चार गट करून मतपेटीद्वारे चाचणी घेण्यात आली. त्यानंतर शेतीशाळेत महिला शेतकऱ्यांना लघु अभ्यास व भातपिकाची उगवण क्षमता चाचणी प्रात्यक्षिक आणि भात बियाण्याला मिठाच्या द्रावणाची, रासायनिक आणि जैविक बीजप्रक्रिया कशी करावी याचे प्रात्यक्षिक ही दाखवण्यात आले, तसेच खरीप हंगामात शेतकऱ्यांना बियाणे खरेदी करताना घ्यावयाची काळजी, जमिनीची पूर्वमशागत, रोपवाटिका तयार करणे व रोपवाटिकेची काळजी घेणे आर्दीविषयी मार्गदर्शन कृषी सहाय्यक मनीषा काळे यांनी केले.

भातपिक विमा आणि १० टक्के खतांची बचत याविषयी मार्गदर्शन कृषी सहाय्यक मनोज कदम यांनी केले. लघु अभ्यासात माती परीक्षणानुसार खतवापर, खतांच्या मात्रा काढणे यावर मंडळ कृषी अधिकारी व्ही. डी. अहिरे यांनी विस्तृत माहिती देत कृषक ॲप वापरण्यासाठी सिद्धता ठेवली पाहिजे, तसेच अस्मानी संकटाचा सामना करण्यासाठी सर्व शेतकऱ्यांनी भातपिक विमा योजनेत सहभागी होण्याचे आवाहन केले.

# दिल्लीतील तरुण लोणावळ्यातील नागफणीत बेपत्ता

**खोपोली : प्रतिनिधी**

लोणावळ्याजवळील कुरवंडे येथील नागफणी येथे फिरायला गेलेला दिल्ली येथील एक तरुण शुक्रवारी (दि. २०) दुपारपासून बेपत्ता झाला आहे. बेपत्ता असलेल्या तरुणाने त्याच्या भावाच्या मोबाईलवर मेसेज करून माहिती दिली, मात्र मेसेजनंतर या तरुणाचा मोबाईल बंद दर्शवित आहे. इरफान शहा (वय-२४, रा.दिल्ली) असे या तरुणाचे नाव असून लोणावळा शहर पोलीस, श्वानपथक पथक, लोणावळ्यातील शिवदुर्ग मित्र व खोपोलीतील यशवंती हायकर्स ही दोन आपत्कालीन पथकेही ड्रोन कॅमेऱ्यांच्या सहाय्याने तरुणाचा शोध घेत आहेत.



लोणावळा शहर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिल्ली येथील इरफान शहा हा तरुण शुक्रवारी लोणावळ्यात एकटाच फिरायला आला होता. फिरताना तो नागफणी परिसरातील जंगलात भरकटला. इरफानला आपण भरकटला असल्याची खात्री झाल्यावर त्याने याबाबत त्याच्या भावाला मेसेज करून माहिती दिली. माहिती दिल्यानंतर इरफानचा मोबाईल बंद दर्शवित आहे. माहिती मिळाल्यानंतर इरफानच्या भावाने त्याच्या मित्राच्या मदतीने लोणावळा शहर पोलीस ठाण्याशी संपर्क साधून या घटनेची माहिती पोलिसांना दिली. लोणावळा उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंद्र पाटील व लोणावळा शहर पोलीस निरीक्षक सिताराम डुबल यांनी याबाबत लोणावळ्यातील शिवदुर्ग मित्र व खोपोलीतील यशवंती हायकर्स तसेच श्वान पथकाशी संपर्क साधून शोध मोहिमेसाठी प्राचारण केले. रात्र झाल्यामुळे शोधमोहीम थांबविण्यात आली.

# मुरूड समुद्रकिनारा पर्यटकांनी गजबजला

**मुरूड : प्रतिनिधी**

सुटीचा शेवटचा हंगाम असल्याने मागील दोन दिवसांपासून मुरूड समुद्रकिनारा पर्यटकांनी फुलला आहे. हॉटेल व लॉजमध्ये तुडुंब गर्दी पहावयास मिळत आहे. वाहनांची संख्या वाढल्याने समुद्रकिनारी रस्त्यावर ट्रॅफिक पहावयास मिळाले.

उंटस्वारी व घोडागाडीचा मनमुराद आनंद घेताना पर्यटक दिसत होते. स्वतःची वाहने घेऊन आलेल्या पर्यटकांची बेसुमार गर्दी जंजिरा किल्ला पहावयास मिळाली. राजपुरी येथे गाड्या पार्क करून जेट्टीवरून शिडाच्या होड्यांद्वारे किल्ल्याकडे पर्यटकांना नेले जाते. रविवारी सकाळपासूनच समुद्रकिनारी असंख्य पर्यटक विविध भागातून कुटुंबासह मोठ्या संख्येने समुद्रकिनारी दाखल झाले आहेत.

पर्यटकांनी मुरूड समुद्रकिनारच्या हॉटेल, रेस्टॉरंट, लॉजिंग व फार्महाऊस यांना पसंती दिल्याचे दिसून येते. मुरूड तालुक्यातील ऐतिहासिक जंजिरा किल्ला, काशीद, कोर्लई किल्ला, चिकणी, बारशीव, सवतखडा, दत्तमंदिर, गारंबी अशा विविध पर्यटनस्थळावर गर्दी केली आहे.

पर्यटकांना आकार्षित करण्यासाठी विविध हॉटेल, रेस्टॉरंटच्या मालकांनी कोकणी, गोमंतक, कोळी, आगरी अशा मासांहारी पदार्थांची मेजवानी ठेवली आहे. यामुळे हजारो रूपयांची आर्थिक उलाढाल झालेली दिसून येत आहे.

काशीद व मुरूड समुद्रकिनारा पर्यटकांनी मोठी गर्दी केली होती. काशीद समुद्र येथील रस्त्याच्या दोन्ही बाजूस वाहनांची मोठी गर्दी असल्याने वाहतूक काही तास खोळंबली होती. जिथे पहावे तिथे वाहनांच्या मोठ्या रांगा दिसत होत्या. त्याचप्रमाणे असंख्य पर्यटकांनी समुद्र स्नान याचा आनंद लुटताना पहावयास मिळत होते.

**मुरूड, काशीद या ठिकाणी रविवारी ३० हजारांपेक्षा जास्त पर्यटक मोठ्या प्रमाणात आढळून आले आहेत. पर्यटकांची संख्या वाढल्याने सर्व हॉटेल, लॉजिंग हाऊसफुल्ल झाले आहेत.**



# पालीत सार्वजनिक स्वच्छतागृहाची वानवा


## मूलभूत सोयीसुविधांबाबत उदासिनता

**पाली : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील अष्टविनायकाचे प्रख्यात धार्मिक स्थळ व सुधागड तालुक्याचे मुख्यालय असलेल्या पालीत विकासाच्या नावाची बोंबाबोंब दिसून येते. पालीमध्ये सद्य स्थितीत सार्वजनिक स्वच्छतागृहाची वानवा आहे. त्यामुळे महिला व पर्यटकांची कुचंबना होत आहे.

शनिवार, रविवार व सार्वजनिक सुटीच्या दिवशी पाली शहर गजबजलेले असते. सुधागड तालुक्यातील व तालुक्याबाहेरील नागरिक खरेदी, शासकीय कामे करण्यासाठी तसेच विद्यार्थी शाळा व महाविद्यालयात जाण्यासाठी, रुग्ण दवाखान्यासाठी पालीत येतात, मात्र कुठेच सार्वजनिक स्वच्छतागृह नसल्याने अनेकांची कुचंबना होते. त्यामुळे महत्त्वाच्या ठिकाणी सार्वजनिक स्वच्छतागृह उभारावेत, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

बल्लाळेश्वर देवस्थानच्या वतीने भक्तनिवास क्र. १ जवळ स्वच्छतागृह आहे, मात्र भाविकांसाठी ते बनविले आहेत. त्याचा वापर पादचारी व इतर लोकांना शक्य नाही. बसस्थानकदेखील तोडले आहे. दर्ग्यानजिक असलेल्या स्वच्छतागृहांची तर प्रचंड दुरावस्था झाली आहे. त्यामुळे किमान मोक्याच्या ठिकाणी तरी सार्वजनिक स्वच्छतागृह असणे गरजेचे आहे, असे संदीप पाटील, बोकडविरा या पर्यटकाने सांगितले.



### जुन्या स्वच्छतागृहांची झालीय दुरवस्था

**काही वर्षांपूर्वी पालीमध्ये ठिकठिकाणी जसे जुने पोलीस स्थानक, मधली आळीतील लवाटे चौक आदी ठिकाणी सार्वजनिक स्वच्छतागृहे होती, मात्र सध्या या स्वच्छतागृहांची पडझड झाली आहे.**

**पालीत आजघडीला सर्वात मोठी समस्या म्हणजे स्वच्छतागृहांचा अभाव. बाहेरगावाहून आलेले लोक, पादचारी आणि भाविक यांचे यामुळे हाल होतात. त्यामुळे पालीत किमान दोन ठिकाणी नाक्यांवर तरी स्वच्छतागृह बांधणे आवश्यक आहे.**

**– शरद गोळे, नागरिक, पाली**

**रोजगार व इतर कामासाठी पालीत रोज हजारो लोक खेड्यापाड्यातून पालीत येतात, मात्र येथे स्वछतागृह नसल्याने महिला, पुरुषांची कुचंबना होते. शासनाने याचा विचार करावा व सुविधा द्याव्यात.**

**– रमेश पवार, आदिवासी समाज नेते**

# नवी मुंबईत आदिवासींसाठी घरकुल योजना

## आमदार गणेश नाईक यांच्या हस्ते आडिवली-भुतवलीत घरांचे वाटप, कमानीचे उद्घाटन

**नवी मुंबई : बातमीदार**

आमदार गणेश नाईक यांच्या हस्ते शनिवारी (दि. २१) आडिवली-भुतवली गावातील २१ आदिवासी बांधवांना महापालिकेच्या घरकुल योजनेतील घरांचे वाटप करण्यात आले. गावासाठी बांधलेल्या कमानीचे उद्घाटनही करण्यात आले. आमदार गणेश नाईक यांच्याच संकल्पनेतून महापालिकेच्या माध्यमातून शहरातील आदिवासींसाठी घरकुल योजना साकारण्यात आली आहे.




या वेळी आमदार नाईक म्हणाले की, नवी मुंबई ही केवळ कोळी व आगरी बांधवांची मूळ भूमी नसून आदिवासींचीदेखील आहे. त्यामुळे येथील एकही आदिवासी बांधव घरांपासून वंचित राहणार नाही. आदिवासींना सुविधा देताना कायदा आड येता कामा नये. तसे झाले तर कायदा मोडून घरे बांधू. मागील २५ वर्षे नवी मुंबईच्या जनतेने आमच्यावर विश्वास ठेवला असून सुजाण जनतेने चांगल्या लोकांना निवडून दिल्यानेच शहराचा नेत्रदिपक विकास झाला आहे. जनतेचा हा विश्वास यापुढेही कायम राहिल. माजी नगरसेवक रमेश डोळे यांनी प्रास्तविकात आमदार नाईक यांच्या सहकार्यामुळेच आडिवली-भुतवलीतीचा विकास झाल्याचे सांगितले. आणखी किमान १०० गरीब व गरजू आदिवासी घरांच्या प्रतिक्षेत असल्याचे सांगून त्यांच्यासाठी घरकुल योजना राबविण्याची विनंती केली. आडिवली-भुतवलीतीसारखे आदर्श आदिवासी गाव संपूर्ण ठाणे जिल्ह्यात नसल्याचे माजी नगरसेवक चंद्रकांत पाटील म्हणाले. आमच्या नेतृत्वाच्या सुचनेनुसार आम्ही वर्षाचे ३६५ दिवस, २४ तास कार्यरत असतो असे ते म्हणाले.

माजी महापौर जयवंत सुतार म्हणाले की, आमदार नाईक हेच नवी मुंबईचे शिल्पकार असून आदिवासींसाठी घरकुल योजना त्यांच्याच प्रयत्नांतूनच आकारास आली आहे. माजी नगरसेवक रमेश डोळे यांच्या पाठपुराव्यामुळे आधुनिक शाळा, मैदान, स्वच्छतागृह, पाण्याच्या टाक्या, रस्ते अशा सर्व आवश्यक सुविधा आडिवली-भुतवलीत आहेत. आ. नाईक यांनी आदिवासी बांधवांसाठी महानगर गॅसची जोडणी उपलब्ध करून द्यावी.

> **झोपडीवजा खोल्यांमध्ये आम्ही अनेक वर्षे राहत होतो. आता आम्हाला मोठी आणि पक्की घरे मिळाली आहेत. याचा खूप आनंद आहे.**
> **-विनायक वनगा, लाभार्थी**

शासन स्तरावर आदिवासी बांधवांचे दावे मंजूर होण्यासाठी महापालिकेची वॉर्ड समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीचा अहवाल राज्य शासनाकडे जाणे अपेक्षित आहे, मात्र या समितीची बैठकच होत नाही, याकडे माजी नगरसेवक रमेश डोळे यांनी सांगितले.

नवी मुंबईत आठ विभाग असून प्रत्येक विभागात तीन ते चार आदिवासी पाडे आहेत. एकुण १९ आदिवासी पाडे असून सुमारे तीन ते साडेतीन हजारांची आदिवासी वस्ती आहे. आडिवली-भुतवली हे आदिवासींचे सर्वांत मोठे गाव आहे. पावणे, श्रमिक नगर, खैरणे कातकरी पाडा या पाड्यातील आदिवासींना यापूर्वी घरांचे वाटप करण्यात आले आहे. आडिवली-भुतवलीतील घरे ३५० चौरस फुटांची आहेत.

# वाशीतील वृक्षतोड प्रकरणात मंत्री आव्हाडांची शिवसेनेवर कुरघोडी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईतील वाशी या मध्यवर्ती उपनगरातील ३९० डेरेदार झाडे विकासाच्या नावाखाली तोडण्याचे बेत महापालिकेतील प्रशासकीय राजवटीत आखले जात असताना गृहनिर्माणमंत्री जितेंद्र आव्हाड यांनी शनिवारी (दि. २१) या निर्णयाविरोधात ट्वीटहल्ला चढवत अशी झाडे कापणे म्हणजे पाप ठरेल अशी भूमिका घेत या प्रकरणी पर्यावरणमंत्री आदित्य ठाकरे यांना आव्हान दिले. प्रशासकीय राजवटीत ठाण्यातून नवी मुंबई महापालिकेचा कारभार हाकणारे शिवसेनेतील बडे नेते या उड्डाणपुलासाठी आग्रही असल्याची चर्चा जोरात आहे. आव्हाडांनी या प्रकरणात शिवसेनेवर कुरघोडीची संधी साधल्याची चर्चा आहे.

पामबीच मार्गाशी संलग्न असलेल्या रस्त्यावर तीन किलोमीटर अंतराचा उड्डाणपूल उभारण्यासाठी नवी मुंबई महापालिकेने एनसीसी कन्स्ट्रक्शन नामक ठेकेदाराला ३६३ कोटी रुपयांचे काम बहाल केले आहे. महापालिकेच्या प्रस्तावानुसार महात्मा फुले जंक्शन-अरेंजा कॉर्नर ते कोपरी उड्डाणपूल प्रकल्पासाठी ३८४ झाडे स्थलांतरीत, तर सहा वृक्ष कापले जाणार आहेत. शहरातील काही पर्यावरण संस्था आणि लोकप्रतिनिधींनी यासंबंधी आवाज उठवताच महापालिकेने हरकती नोंदविण्यास मुदतवाढ देत २० जून पर्यत ही प्रक्रिया पुढे ढकलली आहे.

या उड्डाणपुलाच्या व्यवहार्यतेवर सातत्याने प्रश्नचिन्ह उपस्थित होत असताना ठाण्यातील काही बड्या नेत्यांचा आग्रहामुळे महापालिका प्रशासनाने हे काम पुढे रेटल्याची चर्चाही सुरू आहे. अतिशय रुंद असलेल्या या मार्गालगत वाहनांचे सुटे भाग विकणारी दुकाने तसेच काही वाणिज्य संकुलाची अस्थापनांची वाहने रस्त्याचा अर्धा भाग अडवून उभी असतात.

वाहतूक पोलिसांकडून या वाहनांवर कारवाई होत नाही. त्यामुळे ३०० ते ५०० मीटरच्या पट्ट्यात काही ठिकाणी वाहनकोंडी होत असते. असे असताना कोणत्याही नव्या आरेखनाचा विचार न करता थेट ३९१ झाडांचा बळी देत महापालिकेच्या अभियंता विभागाने उड्डाणपुलाचा प्रकल्प पुढे रेटला आहे.







## उपमहापौर सीताताई पाटील यांचा सन्मान

**पनवेल : वार्ताहर**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव व बौद्ध पौर्णिमा कार्यक्रम दिमाखदार पद्धतीने साजरा करण्यात आल्याकारणाने बौद्धजन पंचायत समिती पनवेल यांच्या वतीने उपमहापौर सीताताई पाटील यांचा सन्मानचिन्ह देऊन समितीच्या वतीने सन्मान करण्यात आला.

या वेळी बौद्धजन पंचायत समिती पनवेलचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते व त्यांनी सन्मान चिन्ह व पुष्पगुच्छ देऊन उपमहापौर सीताताई पाटील यांचा सन्मान केला.

# शीव-पनवेल महामार्गावरील वाहतूक कोंडीमुळे मनस्ताप

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

वाळू वाहून नेणाऱ्या डंपरचा शुक्रवारी सकाळी सातच्या सुमारास अपघात झाल्याने शीव-पनवेल वाहतूक सुरळीत होण्यास दुपारचे दोन वाजले. डंपरमध्ये ४० टन वाळू असल्याने डंपर सहज बाजूला करणेही शक्य नसल्याने वाहतूक पूर्ववत होण्यास एवढा कालावधी लागला.




पनवेलहून-मुंबईकडे वाळू घेऊन जाणारा डंपर वाशी पथकर नाक्याजवळील दुभाजकाला धडकला. डंपरमध्ये सुमारे ४० टन वाळूचे वजन असल्याने व धडक जोरदार बसल्याने डंपरच्या पुढील चाकाचा ॲक्क्सल रॉड तुटला आणि एका बाजूचे चाक निखळले. त्यामुळे प्रचंड प्रमाणात वाहतूक कोंडी झाली होती. ही वाहतूककोंडी सुमारे चार किलोमीटर अर्थात तुर्भेपर्यंत लांबली गेली होती.

जखमी डंपरचालकास तत्काळ रुग्णालयात दाखल केले तर दुसरीकडे वाहतूक सुरळीत होण्याचे प्रयत्न सुरू केले. सुरुवातीला टोइंग व्हॅनद्वारे डंपर बाजूला करण्याचा प्रयत्न केला. त्यात अपयश आल्याने जेसीबी मशीनचा वापर केला. त्यातही फारसे यश न आल्याने वाळू काढून डंपर बाजूला केला व नंतर वाळू बाजूला केली, अशी माहिती वाहतूक विभागाचे वरिष्ठ निरीक्षक हेमंत पाटील यांनी दिली.

या अपघाताने वाहनचालकांना प्रचंड मनस्ताप झाला असून सकाळी राज्यभरातून मोठ्या संख्येने वाहने मुंबईकडे येतात. त्यात एवढ्या मोठ्या प्रमाणात वाहतूककोंडी झाल्यावरही पथकर मात्र चुकला नाही. पथकर नाक्यापासून ठराविक अंतरापेक्षा अधिक अंतरापर्यंत वाहतूककोंडी झाली तर पथकर न घेता अगोदर वाहतूककोंडी सोडवली जाते. त्यासाठी पिवळ्या रंगाची पट्टीही ओढली जाते, मात्र या ठिकाणी नियमांना हरताळ फासत पथकर वसुली अव्याहत सुरू होती. त्यामुळेही वाहतूककोंडी सुटण्यास उशीर होत होता, अशी प्रतिक्रिया अनेक वाहनचालकांनी दिली. पथकर नाक्यावर वादही झाले.

## संतोष चौधरी पुरस्काराने सन्मानित

**पनवेल : वार्ताहर**

संतोष शंकर चौधरी यांना राज्यस्तरीय सेवा सन्मान (आदर्श शिक्षक) पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



महाराष्ट्र शिक्षक पॅनलतर्फे राज्यस्तरीय सेवा सन्मान पुरस्काराने संतोष चौधरी (कळंबोली) यांचा (भोसरी) पुणे येथील अंकुशराव लांडगे नाट्यगृहात ज्येष्ठ अभिनेत्री निशिगंधा वाड, शिक्षक आमदार विक्रम काळे (मराठवाडा विभाग), पदवीधर आमदार सुधीर तांबे यांच्या हस्ते राज्यस्तरीय सेवा सन्मान पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांनी आजवर केलेले कार्य व विविध उपक्रमांची दखल घेण्यात आली.

या वेळी त्यांना महाराष्ट्र शिक्षक पॅनलतर्फे मानपत्र, सन्मानचिन्ह, शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला.

संतोष चौधरी यांना पुरस्कार मिळाल्याने त्यांचे विविध स्तरांतून अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.


## उरणमध्ये मोफत मातृत्व शिबिर

**उरण :** ज्यांना बाळ होत नाही, जे बाळासाठी प्रयत्न करीत आहेत, त्यांच्यासाठी उरण येथे मोफत मातृत्व शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. संतती टेस्ट ट्यूब बेबी आणि फर्टीलिटी सेंटर यांच्या वतीने व नगराध्यक्ष सायली म्हात्रे यांच्या सौजन्याने उरण येथे हे शिबिराचे आयोजित करण्यात आले आहे. हे शिबिर रविवारी (दि. २९) सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत समाज प्रबोधन, शिक्षण संस्थान चारफाटा येथे आयोजित करण्यात आले आहे. प्रख्यात डॉक्टरांचा वैद्यकीय सल्ला मोफत असून सोनोग्राफी, सिमेन्स ॲनालीसीस वैद्यकीय चाचण्या मोफत केल्या जातील. हॉस्पिटलचा पूर्ण स्टाफ वैक्सिनेट आहे. कोरोनाचे सर्व निर्बंध पाळले जातील. अपॉईंटमेन्ट घेणे आवश्यक आहे. शिबिर नाव नोंदणीसाठी ९८५९८५०८०८ या क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# बलात्कार करणारा तोतया पोलीस गजाआड

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

पोलीस असल्याची बतावणी करून महिलेवर बलात्कार करणाऱ्या तोतया पोलिसाला सानपाडा पोलिसांनी अटक केली आहे. गुरुपाल सिंग पहूजा असे अटक करण्यात आलेल्या तोतया पोलिसाचे नाव असून तो नेरूळमध्ये राहणार आहे. त्याच्यावर रिव्हॉल्वरचा धाक दाखवुन, जीवे ठार मारण्याची धमकी देत पीडित महिला तसेच तिच्या बहिणीवर सहकाऱ्यांना बलात्कार करायला सांगेन अशी धमकी देणे, खंडणी स्वरूपात पैसे घेणे असे गुन्हे दाखल आहेत.



गुरुपाल पहूजा हा सानपाडा सेक्टर ३०, ब्लीस स्पा या ठिकाणी येऊन त्याच्याजवळील रिव्हॉल्वरचा धाक दाखवुन, जीवे ठार मारण्याची धमकी देऊन तसेच पीडित महिला यांना त्यांच्या बहिणीवर सहकाऱ्यांच्या माध्यमातून बलात्कार करायला सांगेल अशी धमकी देऊन, पोलीस असल्याचे सांगत त्याच स्पा मधील केबीनमध्ये नेऊन बलात्कार करायचा. त्याच वेळी अश्लील व्हिडिओ बनवुन पीडित महिला यांना वारंवार फोन करून ते व्हिडीओ पती व सोशल मीडियावर प्रसारित करेल, अशी धमकी देत पैशाची मागणी करत होता. त्यांच्या या मागणीला प्रतिसाद देत पीडित महिलेने गुगलपेच्या माध्यमातून १० हजार रुपये गुरुपाल याला पाठवले. त्यावर न थांबता अजूनच त्रास देण्यास गुरुपाल याने सुरू ठेवल्याने अखेर त्याच्याविरोधात पीडित महिलेने सानपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

या गुन्ह्याची दखल घेत पोलिसांनी शुक्रवारी रात्री उशीरा सानपाडा या ठिकाणाहून गुरुपाल पहूजा याला अटक केल्याची माहिती पोलीस उपनिरीक्षक सुप्रिया पवार यांनी दिली.

# कबुतरांसाठी टाकलेले दाणे ठरतायेत जीवघेणे

## पाप-पुण्याच्या खेळात जीव धोक्यात ▪ विष्ठा व पंखामुळे आजाराचा धोका

**नवी मुंबई : बातमीदार**

अनेक नागरिकांत भूत दया जागोजागी अनुभवयास मिळते. त्यातून कुत्र्यांना मांजरीना सांभाळणे, पक्ष्यांना खाऊ घालणे, सरपटणाऱ्या प्राण्यांची सुटका करणे असे अनेक प्रकार दिसतात. यात सर्वाधिकरित्या कबुतरांना, कावळ्यांना, कुत्र्यांना किंवा तलावातील माशांना खाऊ घालताना अनेकजण गल्लोगल्ली आढळून येतात. मात्र पाप पुण्याच्या नावाखाली दिसून येणारे हे प्रकार प्राण्यांच्या व पक्ष्यांसाठी जीवघेणे ठरू लागले आहेत.



सर्व पक्ष्यांमध्ये मंदगतीने उडणारा व सर्वाधिक घाण करणारा पक्षी म्हणजे कबुतर. रस्त्यांवर टाकल्या जाणारे दाणे टिपण्यासाठी गर्दी करणाऱ्या पक्षांच्या पिसांचा व विष्ठेतून पसरणाऱ्या संसर्गाचा त्रास नागरिकांना वाढता धोका अधिक आहे. त्यासह संथ गतीने उडणारी कबुतरे रस्त्यांवर टाकलेले दाणे वेचताना वाहनांखाली येत असल्याचे अपाम बीच मार्गावर सर्रास दिसून येत आहे. पालिकेने आशा दाणे व खाद्य टाकणार्यांवर कारवाई करण्याची मागणी वाढू लागली आहे.

कबुतर हा पक्षी मानवी वस्तीत किंवा वस्तीजवळ राहणारा आहे. त्यामुळे इमारतींवर ठिकठिकाणी कबुतरे मोठ्या संख्येने आढळतात. सर्वांत जास्त विष्ठेद्वारे घाण करणारा पक्षी म्हणून कबुतराची ओळख आहे. गरीब असणारा व संथ गतीने उडणाऱ्या कबुतरामुळे विविध आजार होण्याची शक्यता आहे. कबूतरांचा वावर हा रहिवाशी भागात असल्याने अनेकदा त्यांच्या विष्ठेतून पडणाऱ्या बियांमुळे इमारतींवर झाडे उगवलेली आढळतात. या झाडांमुळे इमारतीला भेगा पडून इमारत धोकादायक बनते. यासोबत मानवी वस्तीत वावर असणाऱ्या कावळे, चिमण्यांच्या तुलनेत हवेत झेपावताना काबूतरांची पिसे गळण्याचे प्रमाण जास्त असल्याने ते नागरिकांच्या लहान मुलांसाठी आरोग्यांसाठी हानिकारक असते. त्यामुळे नकोशा झालेल्या या कबुतरांना रस्त्यांवर धान्य टाकून मनुष्याकडून मनुष्याच्या सानिध्यात आणले जात आहे.

पालिकेने शहरातील स्वच्छता टिकावी व नागरिकांना शिस्त लागावी यासाठी विविध उपक्रम राबवण्यास सुरुवात केली आहे. कोरोनाच्या संकटकाळात नागरिकांत शिस्त आणण्यासाठी पालिकेने उपद्रव शोध पथके तयार केली होती. रस्त्यांवर प्राण्यांना व पक्ष्यांना खाद्य टाकणाऱ्यांविरोधत पाऊले उचलण्यासाठी पालिकेने अशी पथके नेमून कारवाई करणे गरजेचे आहे.

### कबुतरांमुळे मानवी शरीरात ॲलर्जी

*कबुतरांच्या विष्ठेचा वास, त्यातून होणारे आजार तसेच पावसात कुजल्याने त्यात होणारे किडे लक्षात घेता कबुतरांना रोखणाऱ्या राहिवाश्यांनी सुरक्षित जाळ्यांचा आधार घेण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे इमारतींच्या गॅलरी व खिडक्यांत हल्ली प्लॅस्टिकच्या जाळ्या लावण्याचे प्रमाण वाढल्याचे शहरात दिसून येते. लहान मुले गर्भवती महिला तसेच जेष्ठ नागरिक यांची प्रतिकार शक्ती कमी असते अशामध्ये कबुतरांची विष्ठा संपर्कात आल्यास ऍलर्जीचे प्रमाण वाढते. धूळ, प्रदूषण, कबूतर आणि किड्यांच्या विष्ठेपासून वेगवेगळ्या प्रकारच्या दीडशेहून अधिक प्रकारच्या अलर्जी मानवी शरीरात होतात.*

### दाण्यामुळे कबुतरांसह वाहनचालकांना धोका

*नवी मुंबईच्या भरधाव वाहने धावणाऱ्या पामबीचवर सारसोळे जेट्टीनजीक धान्य टाकले जात आहे. त्यामुळे ही कबुतरे शेकडोंच्या संख्येने येथे जमा होत आहेत. ही कबुतरे अनेकदा वाहनांच्या चाका खाली येऊन चिरडली जात आहेत. कबुतरांना टाकण्यात येणारी धान्ये अनेकदा रस्त्यावर इतरत्र पसरली जात जात असून त्यावरून अनेकदा बाईकस्वार या कडधान्यांवरून घसरून अपघात घडत असल्याचे पामबीचवर अनेकदा दिसून येते. नवी मुंबईतील प्रत्येक विभागनिहाय व रस्त्यांवर असे धान्य दुकानदार वा नागरिक टाकत असल्याचे दिसून येते. सफाई मित्रांचे नवी मुंबईतील प्रत्येक कानाकोपऱ्यातील जागेवर लक्ष असते. त्यांच्याद्वारे पालिका विविध रहिवाशी भाग व पाम बीचवरील मार्गांवर लक्ष ठेवू शकते.*

# स्वच्छता अभियान संपताच नवी मुंबईत कचऱ्याचे साम्राज्य

## भाजपच्या इशाऱ्यानंतर पालिकेची कारवाई

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

स्वच्छता अभियान संपताच नवी मुंबईत पुन्हा घाणेचे साम्राज्य पसरले आहे. यामुळे रहिवाशांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याने भाजप युवती मोर्चाचे अध्यक्ष सुवासिनी नायडू यांनी आंदोलनाचा इशारा देताच पालिकेची यंत्रणा जागी झाली. पालिकेने कचरा उचलुन विविध गृहनिर्माण सोसायट्यांना कचरा वर्गीकरण करण्यास डबे आणि कचरा कुंड्या वाटप केल्या.

नेरूळ प्रभाग क्र ३१, सेक्टर २ मधील इंद्रधनुष्य अपार्टमेंट,तसेच आदर्श अपार्टमेंट, वारणा सोसाययटी व तसेच सेक्टर ४ येथील नेताजी सुभाषचंद्र बोस उद्यान प्रवेशदार येथील कचरा गेले दोन दिवस पडून होता. त्यामुळे विभागात दुर्गंधी पसरत असल्याची तक्रार स्थानिक नागरिकांनी नवी मुंबई युवती जिल्हाध्यक्ष सुहासिनी नायडू यांना केल्यानंतर नायडू यांनी तत्काळ संबंधित अधिकाऱ्यांना संपर्क करून ताबडतोब कामगार बोलवुन कचरा उचलून साफसफाई करून द्या, अन्यथा महापालिका मुख्यालयासमोर आंदोलन करू असा इशारा दिला. यामुळे पालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या स्वच्छता निरीक्षकांनी तत्काळ कचरा उचलून, कचरा वर्गीकरण करण्यासाठी डबे आणि सार्वजनिक कचरा कुंडी दिली.

ही कारवाई केल्याबद्दल नायडू यांनी आयुक्तांचे आभार मानले तसेच नागरिकांनीदेखील जबाबदारीने कचरा कुंडीतच टाकावा व महापालिकेस साथ द्यावी, असे आवाहन केले.



# कर्जतमध्ये टँकरच्या पाण्यासाठीही परवड

## टंचाईग्रस्त स्थानिकांचा शासनाकडे पाठपुरावा

**कर्जत : बातमीदार**

कर्जत तालुक्यात आदिवासी भागात पिण्याच्या पाण्यासाठी स्थानिकांना वणवण भटकावे लागत आहे. पाण्यासाठी सुरू असलेली वणवण लक्षात घेऊन सर्व पाणीटंचाईग्रस्त गावे आणि वाड्या यांनी टँकरने पाणीपुरवठा करण्याची मागणी जोर धरत आहे. दरम्यान, सध्या कर्जत तालुक्यात केवळ तीन गावे आणि पाच वाड्या या ठिकाणी शासनाचे टँकर पाणी पोहचवत असून तालुक्यातील अन्य पाच वाड्यांनी आपल्याला टँकर पाणी मिळावे यासाठी शासनाकडे पाठपुरावा करीत आहेत.


(छाया : संतोष पेरणे)

कर्जत तालुक्याची भौगोलिक रचना ही डोंगर उंचवटे आणि खोलगट भाग असून या तालुक्यातील एकमेव चार प्रमुख नद्यांपैकी पेज ही नदी बारमाही वाहणारी तर एक उल्हास नदी पेजला मिळेपर्यंत कर्जत तालुक्याच्या अर्ध्या भागात कोरडी असते. आंबिवली येथे पेज नदी उल्हास नदीला मिळते आणि तेथून उल्हास नदी बारमाही वाहती होती. तर चिल्लार आणि पोश्री या दोन नद्या उन्हाळ्यात कोरड्या असतात. त्यात तालुक्याचा मोठा भाग हा दुर्गम असून या भागात दरवर्षी पिण्याच्या पाण्याची समस्या कायम असते. तेथील पाणीटंचाई निवारण्यासाठी दरवर्षी शासनाला टँकर सुरु करावे लागतात आणि पाण्याची समस्या पाणीटंचाई काळात दूर करावी लागते. या वर्षी कर्जत तालुक्यातील ५६ आदिवासी वाड्या-पाडे आणि २३ गावे पाणीटंचाईग्रस्त असून त्यांचा समावेश शासनाच्या पाणी टंचाई कृती आराखड्यात करण्यात आला आहे. तालुक्याच्या अर्ध्या भागातून वाहणाऱ्या दोन कोरडया नद्या आणि त्या भागाचातील पाणीटंचाई यामुळे कर्जत पंचायत समिती तसेच कर्जत तहसील कार्यालय यांच्याकडे पाणी मिळावे यासाठी मोठी मागणी सुरू आहे.

यावर्षी ९मे रोजी कर्जत तालुक्यात टँकरने पाणीपुरवठा करण्यास सुरुवात झाली त्यात शासनाचे १२ हजार लिटर क्षमतेचे दोन टँकरच्या माध्यमातून पाणीपुरवठा सुरू झाला आहे. तालुक्यातील मोग्रज ग्रामपंचायत मधील मोग्रज, पिंगळस आणि नांदगाव ग्रामपंचायत मधील मोहपाडा या गावांना शासनाच्या टँकरमधून पाणीपुरवठा केला जात आहे. तर तालुक्यातील मोग्रज ग्रामपंचायत मधील जांभुळ्वाडी, विठ्ठलवाडी, खांडस ग्रामपंचायत मधील बेलाचीवाडी आणि पाथरज ग्रामपंचायत मधील ताडवाडी, मोरेवाडी मध्ये पिण्याच्या पाण्याची सोया शासकीय टँकर करीत आहे. आता तालुक्यातील आणखी पाच आदिवासी वाड्यांनी शासनाचे टँकरची मागणी केली आहे. पाणीटंचाई भागातील पाण्याची स्थिती खालावल्यामुळे त्या त्या ग्रामपंचायतकडून टँकर सुरू करण्यात यावेत असे प्रस्ताव कर्जत पंचायत समितीकडे पाठवण्यात आले आहेत. त्यात खांडस ग्रामपंचायत मधील वडाचीवाडी, चाफेवाडी, पादीरवाडी, मेंगाळवाडी आणि अंभेरपाडा ग्रामपंचायत मधील अंभेरपाडा यांचे प्रस्ताव शासकीय टँकरच्या मागणीसाठी पोहचले आहेत.

**कर्जत तालुक्यात सर्वत्र पाण्याची टंचाईची परिस्थिती उद्रवली असल्याने शासनाने ज्या ज्या गावे आणि वाड्यांचा समावेश पाणीटंचाई कृती आराखडामध्ये केला आहे. मे महिना अर्ध्यावर आला असल्याने जी २३ गावे आणि ज्या ५६ आदिवासी वाड्या यांचा समावेश पाणीटंचाई आराखड्यात आहे त्या सर्व ठिकाणी शासनाचे टँकर पाठवावे आणि तेथील पाणीटंचाई दूर करावी.**

**-भरत शीद, अध्यक्ष कर्जत तालुका आदिवासी ठाकूर-कातकरी समाज संघटना**

**आमच्या कार्यालयाकडे टँकरची मागणी करणारे प्रस्ताव आले की आम्ही त्या त्या गावे-वाड्यांमध्ये जाऊन तेथील परिस्थिती पाहतो आणि टँकर सुरू करण्याची परवानगी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे मागतो. यावर्षी टँकर सुरू करण्याचे अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालयाने उपविभागीय अधिकारी यांना दिले आहेत. त्यामुळे शासनाचे टँकर सुरू करण्याची मागणी करणारे सर्व प्रस्ताव प्रांत अधिकारी कार्यालयाकडे पाठवले आहेत. त्यांच्या कडून कार्यादेश आल्यावर तत्काळ टँकर सुरू केले जातील.**

**-तुकाराम साबळे, गटविकास अधिकारी, कर्जत पंचायत समिती**

# दहिवलीतील शवदाहिनीचे पत्रे जीर्ण

## पावसाळ्यापूर्वी बदलण्याची गरज

**कर्जत : प्रतिनिधी**

नगर परिषद हद्दीतील दहिवली परिसरात असलेल्या गॅस शवदाहिनीवरील पत्रे जीर्ण झाले आहेत, ते पत्रे पावसाळ्यापूर्वी बदलले नाही तर मशीनवर पाणी पडून शवदाहिनी बंद पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे नगर परिषदेने शवदाहिनीवरील जीर्ण झालेले पत्रे त्वरित बदलावेत, अशी मागणी होत आहे.




(छाया : विजय मांडे)

कर्जत नगर परिषद क्षेत्रात मुद्रे, गुंडगे, भिसेगाव, कर्जत, दहिवली या ठिकाणी स्मशानभूमी आहेत. मात्र त्या ठिकाणी लाकडांचा वापर करून अंत्यविधी केले जातात. कर्जत नगर परिषद व मुंबई मेट्रोपोलिटन रिजनच्या इन्व्हायरमेंट इम्प्रुमेंट सोसायटी मार्फत दहिवली येथील स्मशानभूमीमध्ये २० जानेवारी २०११ रोजी गॅसवर आधारित शवदाहिनीचे भूमिपूजन करण्यात आले होते. ३ मार्च २०१३ रोजी ही गॅसवर आधारित शवदाहिनीचे लोकार्पण करण्यात आले.

नगर परिषद क्षेत्रातील स्मशानभूमीत लाकडांची कमतरता भासत असल्याने दहिवली येथील गॅसवर आधारित शवदाहिनीमध्ये अंत्यविधी करण्याचा कल वाढला आहे, मात्र या स्मशानभूमीतील शववाहिनीची दुरुस्ती करणे महत्त्वाचे आहे. शवदाहिनी मशीन असलेल्या शेडचे पत्रे नऊ वर्षांमध्ये जीर्ण झाले आहेत ते या पावसाळ्यापूर्वी बदलणे गरजेचे आहे. अन्यथा जीर्ण झालेल्या पत्रातून पाणी पडून शवदाहिनी मशीन बंद पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे या पावसाळ्यापूर्वीच शवदाहिनीच्या शेडवरील जीर्ण झालेले पत्रे बदलणे गरजेचे आहे.

# मुरूड तालुक्यात पूर्वमोसमी पावसाच्या हलक्या सरी; हवेत गारवा

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड शहरासह दोन दिवसापासून ढगाळ वातावरण पसरले आहे. रविवारी तालुक्यातील काही भागात तुरळक स्वरूपाचा पाऊस झाला आहे. त्यामध्ये नांदगाव या भागात पाऊस झाला आहे. यामुळे हवेमध्ये काही प्रमाणात गारवा जाणवला.

पावसाच्या आगमनाची पाहण्याची प्रतीक्षा लवकरच संपण्याची शक्यता आहे. पुढील काही दिवसात मान्सून केरळमध्ये धडकेल अशी शक्यता निर्माण झाली आहे. सर्व काही सुरळीत राहिल्यास जून महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात पहिल्या पावसाच्या सरी कोसळण्याची चिन्ह दिसत आहेत. त्यामुळे जिवघेण्या उष्णतेमुळे हैराण झालेल्या नागरिकांना लवकर दिलासा मिळणार आहे.

पावसाची चाहूल लागताच शेतकरी लोकांनी आपल्या शेती मध्ये मशगतीची कामे सुरू केली आहेत. संपूर्ण शेतामध्ये गवताच्या व सुका पालापाचोळा एकत्र करून जाळला जातो. त्यामुळे गवताची तृण जळले जावून पिका व्यतिरिक्त आणखी कोणतीही झाडे झुडपे वाढत नाहीत.

असा हा कार्यक्रम सर्व शेतकरी करीत असतात हवामान खात्याने पावसाचा अंदाज मुबलक पाऊस होणार असल्याचे संकेत दिल्यामुळे शेतकरी सुखावला असून शेतीच्या कामात आता तो व्यस्त झाला आहे.

मुरूड तालुक्यात ३९०० हेक्टर हे क्षेत्र भात शेतीचे असून कृषी विभगार्मफत शेतकऱ्यांना बियाणे वाटप सुधा करण्यात आले आहे. तालुक्यात खत सुद्धा उपलब्ध झाले असून शासनाने निर्धारीत केलेल्या दराप्रमाणे खत शेतकऱ्यांना उपलब्ध होत आहे. पावसाची चाहूल लागताच बळी राजा शेतीच्या कामात व्यस्त झाला आहे.



# इलेक्ट्रीकल कॉन्ट्रॅक्टर्स जिल्हाध्यक्षपदी निलेश पाटील

**रेवदंडा : प्रतिनिधी**

इलेक्ट्रीकल कॉन्ट्रॅक्टर वेल्फेअर असोसिएशन पेण जिल्हा रायगड या संघटनेची निवडणूक चौल-खालापूर येथे नुकतीच झाली. या निवडणूकीत अलिबागचे निलेश पाटील यांची इलेक्ट्रीकल कॉन्ट्रॅक्टर्स जिल्हा अध्यक्षपदी निवड करण्यात आली.


(छाया : महेंद्र खैरे)

या वेळी जिल्ह्यातील इलेक्ट्रीकलची कामे करणारी इलेक्ट्रीकल कॉन्ट्रॅक्टर्स मोठ्या संख्येने उपस्थित होते. इलेक्ट्रीकल कॉन्ट्रॅक्टर वेल्फेअर असोसिएशन पेण जिल्हा रायगड या संघटनेची निवडणूक रायगड जिल्हा संघटेनेचे जेष्ठ सभासद राजेश सानप व माजी अध्यक्ष किरण बोरसे यांचे मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. महावितरणाचा पेण सर्कल अंतर्गत असलेल्या इलेक्ट्रीकल कॉन्ट्रॅक्टर्स संघटनेच्या अध्यक्षपदी निलेश शरद पाटील यांची एकमताने निवड करण्यात आली, तसेच पेण डिव्हीजनचे धनजंय पाटील, रोहा डिव्हीजनचे दादासाहेब धुमाळ, खोपोली डिव्हीजनचे जंगम, व अभिजीत जाधव यांची उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. तसेच संघटनेच्या सचिवपदी भालचंद्र जोशी यांची फेरनिवड करण्यात आली. तर दिनेश पाटील यांना खजिनदार पदाची जबाबदारी सोपविण्यात आली. या वेळी उपस्थित इलेक्ट्रीकल कॉन्ट्रॅक्टर्सने मनोगत व्यक्त केले व संघटनेच्या नवीन कार्यकारणीस शुभेच्छा दिल्या.

# महाडमध्ये फ्रेंड्स ग्रुपच्या रक्तदान शिबिराला प्रतिसाद

**महाड : प्रतिनिधी**

महाड तालुक्यात क्रीडा क्षेत्रात गेल्या तीस चाळीस वर्षे कार्यरत असलेल्या फ्रेंड्स ग्रुप परिवारातर्फे सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून रविवारी (दि. २२) रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात ३३ रक्त बाटली संकलित करण्यात आल्या.

शिबिरामध्ये महिला सदस्यांनी सहभाग घेतला होता. मंडळाच्या सदस्या सुप्रिया जाधव, रुपाली गांधी, पूजा जगताप यांच्यासह शहरातील असंख्य महिलांनी रक्तदान केले. ह्या रक्तदान शिबिराचे औचित्य साधून फ्रेंड्स परिवारने अजून एक सामाजिक बांधिलकी स्वीकारून जनकल्याण रक्तपेढीला २१ हजार रुपयांची देणगी दिली. देणगीचा धनादेश रक्तपेढीचे अध्यक्ष धनंजय परांजपे यांच्याकडे सुपूर्द करताना महाड शहरातील सामाजिक कार्यकर्ते नाना जगताप, सुदेश कलमकर, संदीप जाधव, उमेश जगताप आणि सर्व सदस्य या वेळी उपस्थित होते


(छाया : महेश शिंदे)

रक्तपेढीचे आयोजन श्री बाबा (समीर) शेडगे, अनिल अजगरे, समीर पाटेकर व त्यांच्या अन्य सहकाऱ्यांनी केले होते, तसेच जनकल्याण रक्त पेढीकडून शिबिर यशस्वी करण्यासाठी मोलाचे सहकार्य लाभले.

# एसआरटी तंत्रज्ञान ठरतेय आदर्शवत | ३० जिल्ह्यांतील हजारो शेतकऱ्यांकडून अवलंब

**कर्जत : बातमीदार**

नेरळ येथील सगुणाबाग कृषी पर्यटन केंद्र तेथील प्रयोगशील शेतीसाठी प्रसिद्ध आहे. तेथे शेतकऱ्यांसाठी विविध तंत्रज्ञान विकसित केले जात असते. कृषीभूषण, कृषिरत्न शेतकरी शेखर भड़सावळे यांनी विकसित केलेले सगुणा राईस टेक्निक (एसआरटी) तंत्रज्ञान देशातील शेतकऱ्यासाठी आदर्शवत ठरत आहे. एसआरटी पद्धतीचा अवलंब केल्यास नांगरणी आणि कोळपणी न करता एका वर्षात किमान तीन पीके घेता येत असल्याने अनेक राज्यातील शेतकरी या पद्धतीकडे आकर्षित झाले आहेत. दरम्यान, महाराष्ट्रातील ३० जिल्ह्यांमधील हजारो शेतकरी शेतीमध्ये विविध प्रयोग करण्यासाठी शून्य मशागतीवर आधारित एसआरटीचा अवलंब करीत असतात.



शेखर भड़सावळे आणि त्यांच्या टीमने २०११ मध्ये सगुणाबाग राईस टेक्निक शोधून काढली. जास्त उत्पादन देणाऱ्या भाताच्या अनेक जाती सगुणा बागेने विकसित केल्या आहेत. शेतात वर्षातून दोनदा पीके घेण्यासाठी ते ट्रॅक्टरच्या सहाय्याने नांगरणी करायचे. त्याचवेळी मजूर शोधून लावणी तसेच मशागत करावी लागत असल्याने शेखर आणि त्यांच्या सहकारी यांनी नविन काही तर उपाय शोधले पाहिजेत याची वारंवार चर्चा केली. त्यातून सगुणाबाग राईस टेक्निक (एसआरटी) जन्माला आली. एसआरटी म्हणजे नांगरणी न करता शेतात पिके घेण्याची पद्धत.

सगुणा रूरल फाउंडेशनच्या माध्यमातून एक लोखंडी अवजार विकसित करण्यात आले, त्याच्या सहाय्याने एकदा वाफे पाडल्यानंतर पुन्हा चार-पाच वर्षे कोणतेही नविन वाफे पाडण्याची गरज लागणार नव्हती. त्याचवेळी वेळेवर कीटकनाशकांची फवारणी, पाण्याचे नियोजन केल्यास वर्षातून किमान तीन पीके घेता येणे या पद्धतीत सहज शक्य होते. त्याचवेळी प्रामुख्याने कमी पावसाच्या भागातदेखील ही एसआरटी पद्दत फायदेशीर ठरली आहे.त्यामुळे राज्य शासनाच्या कृषी विभागाने हे तंत्रज्ञान शेतकरी वर्गापर्यंत पोहचण्यासाठी विशेष मोहीम सुरू केली आहे.

कमी पाणी असलेल्या भागातील शेतकऱ्यांच्यासाठी ही नवी पढायती वरदान ठरत असल्याचे दिसून येत आहे. कारण राज्यातील ३० जिल्ह्यातील हजारो शेतकरी एसआरटी पद्धतीने शून्य मशागत शेती करीत असल्याची आकडेवारी कृषी विभागाने प्रसिद्ध केली आहे. शेतात एकदा वाफे पाडले की टोकरणी पद्धतीने वेगवेगळी पिके घेता येतात. त्यामुळे एसआरटी तंत्र्ज्ञान याचा अभ्यास करण्यासाठी आता तेथे राज्याबाहेरील शेतकरी येत आहेत. सध्या तेथील एसआरटी वर केलेले भाताचे पीक, तसेच मुग, भुईमुग, ऊस, भाजीपाला, मका, यांच्या शेतीची पाहणी करण्याकरीता आणि या नवीन तंत्र्ज्ञानाचा अभ्यास करण्यासाठी ते शेतकरी येत आहेत. आंध्र प्रदेश, गुजरात, मध्य प्रदेश, कर्नाटक राज्यातील शेतकरी त्यांच्या राज्याच्या कृषी विभागाच्या माध्यमातून कृषी पर्यटन केंद्र असलेल्या सगुणाबागेत येत आहेत.

### का आली एसआरटी पद्धत?

**शेत जमिनीत पिकांचे उत्पादन वाढावे म्हणून शेतकरी मोठ्या प्रमाणात रासायनिक खते यांचा वापर करीत असतात. त्यामुळे शेतातील सेंद्रिय कर्बचे प्रमाण प्रचंड खाली आल्याचे दिसून येत आहे. यावर एसआरटी शेती महत्वाची ठरत आहे, कारण सगुणाबाग मध्ये गेली सहा वर्षे एसआरटी पद्धतीचा अवलंब शेती केली जात आहे. त्यामुळे तेथील जमीनीतील सेंद्रिय कर्बचे प्रमाण ०.३ टक्क्यांवरून १.२३ टक्क्यांपर्यंत वाढले आहे. याचे कारणदेखील महत्त्वाचे असून एसआरटी पद्धतीमध्ये केवळ सेंद्रिय खते वापरली जात असतात. ती सेंद्रिय खाते शेतात वापरली जात असतांना वेगळी पद्धत ती खते पिकासाठी वापरली जात असताना अवलंबिली जाते. त्याचा परिणाम त्या शेतात एक वर्षे नाही तर पुढे काही वर्षे दिसून येत असतो. दूसरीकडे एसआरटी तंत्र्ज्ञानमुळे एका वर्षात किमान तीन पीके घेण्याचे नियोजन करता येते. सगुणाबागेमध्ये एका वर्षाच्या हंगामात भात, कांदा, मुग, भुईमुग, भेंडी, अशी पीके घेतली जात आहेत. त्यात भातावर सर्वाधिक संशोधन सगुणा रूरल फाउंडेशन करीत आहे. कारण भाताचे आपल्या सर्वांच्या अन्नातील प्रमाण अधिक असल्याचे एक कारण आहे.**

### प्रचार आणि प्रसार

**एसआरटी तंत्र्ज्ञान याचा अभ्यास करण्यासाठी आता तेथे राज्याबाहेरील शेतकरी येत आहेत. सध्या तेथील एसआरटी वर केलेले भाताचे पीक, तसेच मुग, भुईमुग, ऊस, भाजीपाला, मका, यांच्या शेतीची पाहणी करण्याकरीता आणि या नवीन तंत्र्ज्ञानाचा अभ्यास करण्यासाठी ते शेतकरी येत आहेत. आंध्र प्रदेश, गुजरात, मध्य प्रदेश, कर्नाटक राज्यातील शेतकरी त्यांच्या राज्याच्या कृषी विभागाच्या माध्यमातुन कृषी पर्यटन केंद्र असलेल्या सगुणाबागेत येत आहेत. त्यांना स्वतः शेखर भड़सावळे, तसेच तेथील एसआरटी वर काम करणारे अनेक एग्रीकल्चर पदवीधर आणि एसआरटी पद्धतीने शेती करणारे शेतकरी हे स्वतः एसआरटी बद्दल जनजागृती करण्याचे काम करीत आहेत.**

# पेणमध्ये भोगावती नदी साफसफाई अभियान

**पेण : प्रतिनिधी**

पेण शहराला लागून असलेली भोगावती नदी जलपर्णीने भरली असल्याने त्या ठिकाणी स्वच्छता अभियान राबविण्यासाठी मागच्या काही दिवसांपासून विविध सामाजिक संघटना पुढे सरसावल्याने पेणच्या भोगावती नदीला साफसफाईचा हातभार लागला आहे.

याच अनुषंगाने पाणी हेच जीवन ओळखून नागरिकांना स्वच्छ पाणीपुरवठा करण्यात यावा याकरिता २३ मे रोजी तालुक्यातील संत, महंत, जल वारकरी, ग्रामस्थ, सामाजिक, सांस्कृतिक मंडळ यासह इतर तरुण मंडळांनी एकत्रित येत आणि याकरिता सामाजिक बांधिलकी जोपासली जाणार आहे. या नदी संवर्धन महोत्सवानिमित्त सकाळी महायज्ञ, ज्ञानेश्वरी पारायण, महिमा पाठ, हरिपाठ, महाआरती आणि दुपारच्यादरम्यान डॉ. पाटकर यांचे जैविक शेती सेंद्रिय शेती पाणी, गो, याविषयी मोलाचे मार्गदर्शन होणार आहे, तर संध्याकाळी ६ वाजता भोगावती नदीची महाआरती होणार आहे.

नागरिकांना नदीमधून पाणी मिळत असून नद्यांमध्ये पाणी आहे म्हणून तर धरण आहेत आणि धरणांमध्ये अडवलेले पाणी आपल्याला नळाद्वारे घरापर्यंत मिळत आहे. त्यामुळे नदी उगमस्थानापासून जिथे सागराला मिळते त्या मार्गातील अनेक जिवांना ती समृद्ध करीत असते आणि यामुळेच आपल्याला निर्मळ पाणी मिळत आहे, मात्र अनेक दिवस तिचे पाणी हे गटाराचे पाणी झालेले असून ती शंभर टक्क्यांनी गाळाने भरली आहे.

आजुबाजूला जलपर्णी अनेक झुडपे, झाड उगवली असल्याने नदीचा श्वास कोंडला आहे. त्यामुळे ही सामाजिक बांधिलकी जोपासत जीवजंतू जगविण्यासाठी आणि स्वच्छ पाणी मिळण्यासाठी भोगावती नदी संवर्धन महोत्सवाचे आयोजन करण्यात असल्याने याकरीता तालुक्यातील सर्व नागरिकांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन समाज प्रबोधन मंचाचे अध्यक्ष ए. बी. पाटील, कार्याध्यक्ष रुपेश कदम, वृक्षमित्र उदय मानकवळे यांनी केले आहे.

# दिल्लीच्या पराभवामुळे बंगळुरू प्लेऑफमध्ये

## टिम डेव्हिडच्या फटकेबाजीने मुंबई विजयी

**मुंबई : प्रतिनिधी**

टिम डेव्हिड (११ चेंडूंत ३४ धावा) आणि तिलक वर्मा (१७ चेंडूत २१ धावा) यांच्या निर्णायक खेळीमुळे शनिवारी झालेल्या आयपीएल क्रिकेट सामन्यात मुंबई इंडियन्सने दिल्ली कॅपिटल्सवर पाच गडी आणि पाच चेंडू राखून विजय मिळवला. त्यामुळे दिल्लीचे स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले असून रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने बाद फेरी (प्लेऑफ) गाठली आहे.

वानखेडे स्टेडियमवर झालेल्या लढतीत १६० धावांचा पाठलाग करताना मुंबईचा कर्णधार रोहित शर्मा (२) लवकर बाद झाला. यानंतर इशान किशन (४८ धावा) आणि डेवाल्ड ब्रेविसने (३७ धावा) चांगली खेळी करीत संघाला सावरले. त्याने तीन चौकार आणि चार षटकार लगावत ३५ चेंडूंमध्ये ४८ धावा केल्या. मग टिम डेव्हिडने आक्रमक खेळी करीत मुंबईला १९.१ षटकांत ५ बाद १६० धावसंख्येपर्यंत पोहचवत विजय मिळवून दिला. त्याने दोन चौकार आणि चार षटकार ठोकले.

तत्पूर्वी मुंबईने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला.



त्यानंतर फलंदाजीसाठी आलेल्या दिल्लीची सुरुवात खराब झाली. सलामीवीर डेविड वॉर्नर पाच धावांवर बाद झाला. मिचेल मार्शच्या रुपात दिल्लीचा दुसरा गडी बाद झाला. सलामीला आलेल्या पृथ्वी शॉने चांगला खेळ करण्याचा प्रयत्न केला, मात्र तो मोठी धावसंख्या उभी करू शकला नाही. त्याने २४ धावा केल्या. त्यानंतर ऋषभ पंत आणि रोवमन पॉवेल या जोडीने संघाला सावरले. पंतने ३३ चेंडूंमध्ये ३९ धावा केल्या, तर पॉवेलने ३४ चेंडूंमध्ये ४३ धावांची शानदार खेळी केली. सरफराज खान (१०) अक्षर पटेल (१९) यांनी निराशाजनक खेळी केली. त्यामुळे २० षटके संपेर्यंत दिल्ली संघ १५९ धावा करू शकला.

**संक्षिप्त धावफलक**

*दिल्ली कॅपिटल्स : २० षटकांत ७ बाद १५९ (रोव्हमन पॉवेल ४३, ऋषभ पंत ३९; जसप्रीत बुमरा ३/२५) पराभूत वि. मुंबई इंडियन्स : १९.१ षटकांत ५ बाद १६० (इशान किशन ४८, डेवाल्ड ब्रेविस ३७; शार्दुल ठाकूर २/३२)*

### पंतने न घेतलेला रिव्ह्यू महागात

दिल्लीच्या पराभवाला संघाचा कर्णधार ऋषभ पंतच कारणीभूत असल्याचे म्हटले जात आहे. मुंबईच्या टीम डेव्हिडला बाद करण्याची चांगली संधी चालून आलेली असतानाही योग्य वेळी डीआरएस न घेतल्यामुळे दिल्लीचा पराभव झाला. शार्दुल ठाकूरने टाकलेला चेंडू डेव्हिडीच्या बॅटची किनार घेत पंतच्या हातात विसावला होता, मात्र खात्री नसल्याने पंत तसेच ठाकूर दोघे गोंधळले. त्यानंतर चेंडू बॅटला लागला नसल्याचे समजत पंतने डीआरएस घेतला नाही, मात्र रिव्ह्यूमध्ये बॅट आणि चेंडू यांचा संपर्क झाल्याचे दिसले. या ठिकाणी पंतने डीआरएस घेतला असता, तर टीम डेव्हिड बाद झाला असता. एकदा जीवदान मिळाल्यानंतर मात्र डेव्हिड दिल्लीसाठी चांगलाच महागात पडला. त्याने अवघ्या ११ चेंडूंमध्ये ३४ धावा केल्या. त्यामुळे मुंबईला विजय सोपा झाला.

# थॉमस चषक विजेत्यांनी घेतली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट

## सर्वतोपरी सहकार्य करण्याची ग्वाही

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

१४ वेळा विजेत्या इंडोनेशियाचा ३-० असा धुव्वा उडवत थॉमस चषक जिंकणारे भारतीय बॅडमिंटनपटू तसेच संघातील इतर सहकाऱ्यांनी रविवारी (दि. २२) सकाळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. या वेळी पंतप्रधान मोदींनी विजेत्या टीमचे तोंडभरून कौतुक केले तसेच सर्वतोपरी सहकार्य करण्याची ग्वाही दिली. ७३ वर्षांच्या स्पर्धेच्या इतिहासातील हे भारताचे पहिलेच विजेतेपद होते.

थॉमस चषक विजेत्या टीमचे विजयानंतर फोनवरून अभिनंदन करताना टीममधील सदस्य असलेल्या उत्तराखंडच्या लक्ष्य सेनकडे विजयाचा आनंद म्हणून अल्मोडा बाल मिठाई आता द्यावी, अशी मागणी पंतप्रधान मोदी यानी केली होती. तेव्हा भेटीदरम्यान लक्ष्य सेन याने मिठाईचा एक बॉक्स पंतप्रधान मोदींना दिला. तेव्हा याबद्दल पंतप्रधानांनी लक्ष्यला आवर्जून धन्यवाद दिले.

यानिमित्ताने थॉमस चषक विजेत्या टीमचे नेतृत्व करणाऱ्या श्रीकांत किदम्बीने संघाची सकारात्मक भूमिका, त्या वेळी असलेली मानिसकता यावर प्रकाश टाकला. टीममधील सर्व सदस्य चांगले खेळतच होते. माझे लक्ष्य होते या सर्वांना एकत्र आणणे, कारण ही एक स्पर्धा होती. त्यामुळे टीमचे एकत्रित कौशल्य अपेक्षित होते, एकसंध खेळणे आवश्यक होते. आम्ही प्रत्येक खेळाच्या वेळी छोट्या छोट्या व्यूहात्मक चाली रचल्या, लक्ष्य निश्चित केले. मला संघाचे लिडर म्हणून फारसे काम करावे लागले नाही, कारण सर्वजण चांगला खेळ करीत होते.

या वेळी सर्व खेळाडूंनी स्पर्धेसाठी दिलेल्या प्रोत्साहन, पाठिंब्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानले.



**सर्वांचे देशवासीयांच्या वतीने अभिनंदन करतो. होय, आम्ही करू शकतो हा सकारात्मक दृष्टिकोन देशाचे बलस्थान बनला आहे. सरकार सर्व प्रकारे शक्य होईल ती मदत तुम्हाला करेल.**
**-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

**मी या टीमचे नेतृत्व केले आणि निर्णायक अशा अंतिम सामन्यात खेळण्याची संधी मिळाली याचा मला आनंद आहे. देशाचे प्रतिनिधित्व करणे ही एक मोठी संधी होती.**
**-श्रीकांत किदम्बी, संघनायक**

# युवा बुद्धिबळपटू प्रज्ञानंदची कार्लसनवर दुसऱ्यांदा मात

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताचा युवा बुद्धिबळपटू प्रज्ञानंदने विश्वविजेत्या मॅग्नस कार्लसनवर वर्षभरात दुसऱ्यांदा विजय मिळवण्याचा पराक्रम दाखवला आहे. प्रज्ञानंदने चेसेबल मास्टर्स ऑनलाइन जलद बुद्धिबळ स्पर्धेच्या पाचव्या फेरीत कार्लसनला नामोहरम केले. तीन महिन्यांपूर्वी प्रज्ञानंदने कालर्सनला प्रथमच हरवून सर्वांचे लक्ष वेधले होते.

झालेल्या सामन्याच्या उत्तरार्धात नॉर्वेच्या कार्लसनकडून झालेल्या चुकीचा फायदा घेत चेन्नईच्या १६ वर्षीय प्रज्ञानंदने विजयाचे तीन गुण खिशात घालत बाद फेरीच्या आशा जिवंत ठेवल्या आहेत. पाचव्या फेरीचा सामना बरोबरीच्या दिशेने वाटचाल करीत असताना ४०व्या चालीला काळ्या मोहऱ्यांनिशी खेळणाऱ्या कार्लसनने रचलेली घोड्याची चाल चुकली. त्यामुळे पुढच्याच चालीला प्रज्ञानंदला हा सामना जिंकता आला.

मग सहाव्या फेरीत प्रज्ञानंदने भारताच्याच पेंटाला हरिकृष्णशी बरोबरी साधली. सातव्या फेरीत प्रज्ञानंदने गॅवेन जोन्सला हरवले, तर आठव्या फेरीत डेव्हिड अँटन गुइजारोकडून त्याने पराभव पत्करला. आठव्या फेरीअखेरीस प्रज्ञानंदचे १२ गुण झाले असून तो डिंग लिरेनसह संयुक्तपणे पाचव्या स्थानावर आहे. चीनचा वेई यि याने एकट्याने आघाडी घेतली असून कार्लसन दुसऱ्या स्थानावर आहे.

फेब्रुवारीत झालेल्या एअरिथग्ज मास्टर्स ऑनलाइन जलद बुद्धिबळ स्पर्धेच्या आठव्या फेरीत प्रज्ञानंदने कार्लसनला हरवून बुद्धिबळ जगताला धक्का दिला होता.

# पनवेल संघाचा अंतिम फेरीत दिमाखदार प्रवेश

## पोयनाड येथील क्रिकेट स्पर्धेत पार्थ पवारची दमदार फलंदाजी

**अलिबाग : प्रतिनिधी**

झुंझार युवक मंडळ पोयनाड आयोजित १२ वर्षांखालील एकदिवसीय ४० षटकांच्या लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेतील उपांत्य फेरीच्या दुसऱ्या सामन्यात प्रतिक क्रिकेट अकॅडमी पनवेल संघाने एजे स्पोर्ट्स असोसिएशन कळंबोली संघाचा पराभव करीत स्पर्धेच्या अंतिम फेरीत दिमाखात प्रवेश केला. आता उरण तालुक्यातील भेंडखळ क्रिकेट अकॅडमी संघाबरोबर त्यांची अंतिम लढत होणार आहे.

पनवेल संघाचा मधल्या फळीतील डावखुरा फलंदाज पार्थ पवार व आराध्य पाटील यांच्या झुंझार खेळाच्या जोरावर संघाने तीन गडी राखून विजय मिळवला. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी स्वीकारलेल्या कळंबोली संघाने ४० षटकांच्या समाप्तीनंतर सर्व गडी गमावत १६८ धावा फलकावर लावल्या होत्या. कळंबोलीच्या आयुष्य महेताने ५७ धावांची खेळी केली, तर प्रणित उलवेकरने २१ धावा केल्या. पनवेल संघाकडून ईशान पाठक याने चार, तर अथर्व पाटीलने दोन बळी घेतले.



प्रत्युत्तरात पनवेल संघाने नऊ गडी गमावत १६९ धावांचे लक्ष पूर्ण केले. मधल्या फळीतील फलंदाज पार्थ पवार याने दमदार फलंदाजी करीत ८५ चेंडूंत १४ चौकारांच्या साहाय्याने ८९ धावा केल्या त्याला आराध्य पाटीलने सुरेख साथ देत २८ धावा काढल्या. कळंबोलीकडून श्लोक साळुंके व आयुष्य महेता यांनी प्रत्येकी दोन फलंदाज बाद केले. दमदार फलंदाजी करणाऱ्या पार्थला सामनावीर म्हणून गौरविण्यात आले.

स्पर्धेतील तृतीय क्रमांकाचा मानकरी ठरला कळंबोलीचा संघ. या संघाला व प्रत्येक खेळाडूला प्रसाद अनंत राऊत (पोयनाड) यांच्याकडून आकर्षक चषक देऊन सन्मानित करण्यात आले. या बक्षीस वितरण कार्यक्रमास झुंझार युवक मंडळाचे सचिव किशोर तावडे, दीपक साळवी, अजय टेमकर, सुजित साळवी, अजित पाटील, प्रतिक मोहिते, मंगेश पवार, अ‍ॅड. पंकज पंडित, संकेश ढोळे, आदेश नाईक उपस्थित होते.

# युझवेंद्र चहलने मोडला हरभजन सिंगचा विक्रम

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलमध्ये राजस्थान रॉयल्सने चेन्नई सुपर किंग्जला नमवून आपले प्लेऑफमधील स्थान निश्चित केले आहे. या सामन्यात राजस्थान संघातील फिरकीपटू युझवेंद्र चहलने मोठा विक्रम रचला आहे.

युझवेंद्र चहलने या सामन्यात २६ धावा देत दोन बळी घेतले. चहलने या हंगामात २६ विकेट्स घेऊन एकाच पर्वात सर्वांत जास्त बळी घेणारा भारतीय फिरकीपटू होण्याचा मान मिळवला आहे. याआधी हा विक्रम फिरकीपटू हरभजन सिंग याच्या नावावर होता. हरभजनने आयपीएलच्या एकाच हंगामात २४ विकेट्स घेतलेल्या होत्या. २०१३ साली हरभजनने या विक्रम केला होता.

युझवेंद्र चहलने इमरान ताहिर या फिरकीपटूची बरोबरी केली आहे. ताहीरनेही एकाच पर्वात २६ विकेट घेतलेल्या आहेत. दरम्यान, चहलचा संघ म्हणजेच राजस्थान रॉयल्स हा संघ प्लेऑफमध्ये पोहचला आहे. त्यामुळे आगामी काळात हा संघ काही सामने खेळणार असून या सामन्यात चहलने एक विकेट घेतली, तर ताहीरचा विक्रम मोडीत निघेल.

# विश्वचषक तिरंदाजी स्पर्धेत भारताची पदकसंख्या पाचवर



**ग्वांगजू : वृत्तसंस्था**

दक्षिण कोरियात सुरू असलेल्या विश्वचषक तिरंदाजी स्पर्धेत भारतीय पुरुष कंपाउंड संघाने शनिवारी झालेल्या अंतिम सामन्यात पिछाडीवरून पुनरागमन करीत फ्रान्सला दोन गुणांनी पराभूत करीत सलग दुसऱ्यांदा सुवर्णपदक मिळवले, तर मोहन भारद्वाजने वैयक्तिक रौप्यपदक मिळवले. त्यामुळे विश्वचषक स्पर्धेच्या दुसऱ्या टप्प्यातील भारताची एकूण पदकसंख्या पाच झाली आहे.

अभिषेक वर्मा, अमन सैनी आणि रजत चौहानचा समावेश असलेल्या पुरुष कंपाउंड संघाने जोरदार पुनरागमन करून फ्रान्सला २३२-२३० असे नमवत सुवर्णपदक मिळवले. मग कंपाऊंड तिरंदाज अभिषेक वर्माने अवनीत कौरच्या साथीने भारताला दुसरे पदक मिळवून दिले. भारतीय जोडीने मिश्र सांघिक गटात तुर्कीच्या अमीरकान हाने आणि आयसे बेरा सुजेर जोडीला १५६-१५५ असे नमवत कांस्यपदक मिळवले.

# सिंधू उपांत्य फेरीत पराभूत

## थायलंड खुली बॅडमिंटन स्पर्धा



**बँकॉक : वृत्तसंस्था**

भारताची तारांकित बॅडमिंटनपटू पी. व्ही. सिंधूचा शनिवारी थायलंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्य फेरीत चीनच्या ऑलिम्पिक विजेत्या चेन यू फेईने सरळ गेममध्ये पराभव केला. तिसऱ्या मानांकित चेनने ४३ मिनिटे चाललेल्या लढतीत जागतिक क्रमवारीत सातव्या स्थानावरील सिंधूला २१-१७, २१-१६ असे पराभूत केले.

सहाव्या मानांकित सिंधूची या सामन्यापूर्वी चेनविरुद्धची कामगिरी ही ६-४ अशी सरस होती, परंतु या लढतीत सिंधूला अपेक्षित कामगिरी करता आली नाही. सिंधूला याआधी जागतिक क्रमवारीत चौथ्या क्रमांकावरील चेनने २०१९च्या 'बीडब्ल्यूएफ' जागतिक मालिकेच्या अंतिम टप्प्यामध्ये पराभूत केले होते.

या हंगामात सिंधूने सय्यद मोदी आंतरराष्ट्रीय आणि स्विस खुल्या बॅडमिंटन स्पर्धेचे जेतेपद पटकाविले, तर आशिया बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेत कांस्यपदक मिळवले. यानंतर सिंधू जकार्ता येथे ७ ते १२ जूनदरम्यान होणाऱ्या इंडोनेशिया मास्टर्स 'सुपर ५००' स्पर्धेत सहभागी होणार आहे.

# बंगळुरू संघाने एकत्रपणे पाहिला मुंबई-दिल्ली सामना



**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई इंडियन्स आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यातील लढत शेवटच्या षटकापर्यंत रंगली. हा सामना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघासाठी खूप महत्त्वाचा होता, कारण दिल्ली संघ पराभूत झाला, तरच बंगळुरूला प्लेऑफमध्ये स्थान मिळणार होते. याच कारणामुळे बंगळुरू संघाच्या सर्वच खेळाडूंचे या सामन्याकडे लक्ष लागले आहे. त्यांनी हा सामना एकत्रपणे पाहिला. त्याचे काही फोटो बंगळुरू संघाच्या सोशल मीडिया अकाऊंटवर शेअर करण्यात आले आहे.

या लढतीत दिल्लीचा पराभव किंवा विजयावर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाचे भवितव्य अवलंबून होते. दिल्ली संघांचा विजय झाल्यास त्याने बंगळुरू संघाशी बरोबरी साधली असती, मात्र रनरेट जास्त असल्यामुळे दिल्ली संघाला प्लेऑफमध्ये प्रवेश मिळण्याची संधी, तर बंगळुरू संघाचे आव्हान संपुष्टात येणार होते, तर मुंबईचा विजय झाल्यास दिल्ली संघ प्लेऑफच्या शर्यतीतून बाद होऊन बंगळुरू संघाला प्लेऑफमध्ये स्थान मिळणार होते. झालेही तसेच. त्यामुळे विजयानंतर बंगळुरूच्या खेळाडूंनी एकच जल्लोष केला.

# विचित्र पद्धतीने पृथ्वी शॉ झाला बाद

**मुंबई : प्रतिनिधी**

दिल्ली कॅपिटल्स आणि मुंबई इंडियन्स यांच्यात अटीतटीची लढत झाली आणि यात मुंबईने बाजी मारली. या सामन्यात विजय अनिवार्य असल्यामुळे दिल्ली संघ पूर्ण ताकदीने मैदानात उतरला होता, मात्र या संघाची सुरुवात काहीशी खराब झाली. डेविड वॉर्नरच्या रूपात पहिली विकेट गेल्यानंतर पृथ्वी शॉ विचित्र पद्धतीने बाद झाला. जसप्रित बुमराहने टाकलेल्या बाऊन्सर चेंडूवर पृथ्वी चांगलाच गोंधळल्याचे दिसले.



दिल्ली कॅपिटल्सच्या २१ धावा झालेल्या असताना डेविड वॉर्नर अवघ्या पाच धावांवर बाद झाला. त्यानंतर संघाची जबाबदार पृथ्वी शॉवर आली. त्याने सुरुवातीपासून चांगली फलंदाजी करण्याचा प्रयत्न केला, मात्र मैदानावर सेट होत असतानाच तो जसप्रित बुमराहच्या चेंडूवर झेलबाद झाला. दिल्लीच्या ३१ धावा झालेल्या असताना मुंबई संघाकडून बुमराहकडे चेंडू देण्यात आला. त्यानेदेखील या संधीचे सोने केले. पृथ्वी शॉला बाद करण्यासाठी त्याने बाऊन्सर चेंडू टाकला. याच चेंडूचा सामना करताना पृथ्वी गोंधळला.

चेंडूकडे पाहताच पृथ्वी शॉ घाबरला. त्याने स्वत:चा बचाव करण्यासाठी हात वर केले, मात्र हाताला लागून चेंडू थेट यष्टीरक्षकाच्या हाती विसावला, तर दुसरीकडे या चेंडूचा सामना केल्यानंतर पृथ्वी थेट जमिनीवर पडला. चेंडू थेट यष्टीरक्षकाकडे गेल्यामुळे पृथ्वीला बाद म्हणून जाहीर करण्यात आले.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com